संपादकीय लेखणीतून...

# सेवा आणि समर्पण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनाला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान' ज्याला "सेवा आणि समर्पण" अभियान म्हणूनही ओळखले जाते, ते राबवले जात आहे. पंतप्रधान मोदींचा सेवाभाव, समर्पण, राष्ट्रभक्ती आणि सुशासनाचा प्रवास जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे. नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, म्हणून प्रशासन लोकाभिमुख करणे. शासन आणि नागरिकांमधील संवाद तसेच लोकसहभाग वाढवणे, हे आहे.

प्रत्येक तालुक्यात आणि ब्लॉक स्तरावर शिबिरे आयोजित करून शासकीय कामे व योजना थेट जनतेच्या दारी पोहोचवणे. रक्तदान शिबिरे आणि आरोग्य तपासणी. सेवा ज्योती कलश यात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रम. वडनगर ते वाराणसी आणि वाराणसी ते वडनगर यात्रा. बचत गटांची स्थापना व महिला सक्षमीकरणाचे उपक्रम. सेवा आणि समर्पण या दोन अशा उदात्त संकल्पना आहेत, ज्या मानवी जीवनाला आणि समाजाला प्रगतीच्या शिखरावर नेतात. जेव्हा एखादी व्यक्ती स्वार्थाचा त्याग करून इतरांच्या कल्याणासाठी कार्य करते, तेव्हा त्याला "सेवा" म्हणतात; आणि जेव्हा ती व्यक्ती त्या कायासाठी आपले सर्वस्व ओवाळून टाकते, तेव्हा त्याला "समर्पण" म्हणतात. हे दोन्ही गुण एकमेकांना पूरक आहेत. पुढे सेवा आणि समर्पण या संकल्पनांची सविस्तर माहिती दिली आहे-

सेवा म्हणजे कोणत्याही अपेक्षेविना इतरांना मदत करणे किंवा समाजोपयोगी कार्य करणे. खऱ्या सेवेमध्ये 'मी काहीतरी उपकार करत आहे' हा अहंकार नसतो. सेवा ही अनेक प्रकारे केली जाऊ शकते. जसे की गरिबांना अन्न-वस्त्र देणे, आजारी लोकांची सुश्रुषा करणे (उदा. रुग्णसेवेमध्ये अहोरात्र झटणाऱ्या परिचारिका), मुक्या प्राण्यांची काळजी घेणे किंवा निसर्गाचे रक्षण करणे. आपल्या मराठी संस्कृतीत संतांनी

"जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा
देव तेथेचि जाणावा "

असे सांगून मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा मानली आहे.

समर्पणाचा अर्थ आणि महत्त्व : समर्पण म्हणजे स्वतःचा अहंकार, इच्छा आणि कल्पना बाजूला ठेवून एखाद्या ध्येयाप्रत किंवा ईश्वराप्रती आपले सर्वस्व अर्पण करणे. ताकद आणि सामर्थ्यः अध्यात्मात समर्पणाला गुलामगिरी न मानत ती एक आंतरिक ताकद मानली जाते. जेव्हा आपण आपली नकारात्मकता आणि अहंकार समर्पित करतो, तेव्हा आपण अधिक सामर्थ्यशाली बनतो. समर्पणामध्ये कर्तेपणाचा अभाव असतो- मी केले ही भावना नसते. जसे की हनुमानजींनी श्रीरामाचरणी स्वतःला पूर्णपणे समर्पित केले होते. जेव्हा एखादे कार्य फळाची अपेक्षा न ठेवता पूर्ण श्रद्धेने समर्पित केले जाते, तेव्हा अपयशाचे दुःख होत नाही, तर प्रत्येक पाऊल एक शिकण्याची देणगी बनते.

स्वराज्याची स्थापना ही केवळ कर्तृत्वाने झाली नाही, तर त्यासाठी मावळ्यांचे अथांग समर्पण आणि निष्ठा कारणीभूत होती. किल्ले आणि इतिहास आपल्याला आजही याच निःस्वार्थ सेवेची प्रेरणा देतात. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, बाबा आमटे आणि गाडगे बाबा यांसारख्या महापुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित केले. आपले सैनिक सीमेवर प्राणांचे जे समर्पण देतात, त्यामुळेच आपण देशात सुरक्षित राहू शकतो. थोडक्यात सांगायचे तर, सेवा हा कर्म मार्ग आहे आणि समर्पण ही त्यामागील शुद्ध भावना आहे. या दोन्ही मूल्यांचा अंगीकार केल्यास व्यक्तीचे मन शांत होते आणि समाजामध्ये प्रेम, बंधुभाव व एकात्मता वाढीस लागते.

संतमहात्मा समजावितात, "समर्पण या शब्दाचे दोन पैलू आहेत. एक आहे समर्पण शब्दाचा पौर्वात्य पैलू तर दुसरा पाश्चात्य दृष्टिकोनातून येणारा. एक प्रकार आहे तो पराभूत झाल्याने केलेले समर्पण. गुलाम स्वतःला समर्पित करतात. ते हृदयातून केलेले समर्पण नसते, तर ते केवळ आपल्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक दुबळेपणामुळे केलेले असते. त्यांना दुबळेपणामुळे वश केले जाते. आता आध्यात्मिक दृष्टीने याचा पूर्णपणे वेगळाच अर्थ आहे. आपण नकारात्मक भावना आणि नकारात्मक गुणांनी त्रस्त होत असतो आणि त्याला तसेच बाळगणे ही अजून मोठी पीडा असते. ती नकारात्मकता सोडून देणे, जी अजून सहणे, हाताळणे अशक्य आहे, तिला आध्यात्मिक दृष्टिकोनातून 'समर्पण' असे म्हटले जाते. हे पूर्णतः वेगळे आणि पाश्चात्य प्रकारच्या पराभव अर्थाच्या समर्पणाच्या अगदी विरुद्ध आहे. हा समर्पणाचा प्रकार म्हणजे त्याला जिंकून घेणे आहे. आपण नकारात्मकता सोडून देऊन, त्याला दूर सारून त्यावर, स्वतःवर, आपल्या मनावर मात केली आहे. म्हणून आध्यात्मिक दृष्टीने समर्पण म्हणजे ताकत व सामर्थ्य होय, गुलामगिरी नव्हे. यामुळेच जेव्हा आपण वैष्णव मंदिरात जातो, तेव्हा तीला शरणागती म्हणतात, ज्याचा अर्थ आहे भगवंताला समर्पण. जेव्हा आपण अशी शरणागती करतो, तेव्हा आपल्या डोक्यावर एक चांदीचा मुकुट ठेवला जातो. या मागचा आध्यात्मिक भाव असा आहे की, जर आपण आपली नकारात्मकता समर्पित केली, तर आपण एखाद्या राजासारखे सामर्थ्यशाली बनतो. कन्नडमध्ये एक म्हण आहे-

"शरणा शरणार्थी"

म्हणजे जो शरण गेला आहे, त्याला मी शरण जातो. इथे संतांना शरण गेलेले म्हणजेच 'समर्पित' असे म्हटले आहे आणि संत हे सर्वात सामर्थ्यवान आणि आदरणीय असतात.

# ब्रह्मचारिणी देवी: तपोबळ व कृतिशिलतेचा जागर

नवरात्रातील दुसरा दिवस म्हणजे संयमातून सामर्थ्य एकवटण्याचा संदेश देणाऱ्या ब्रह्मचारिणी देवीच्या उपासनेचा दिवस. एका हातात जपमाळ आणि दुसऱ्या हातात कमंडलू धारण केलेले तिचे शांत, सात्त्विक रूप भक्तांच्या मनाला सुप्रसन्न करते. ब्रह्मचारिणी म्हणजे ब्रह्माचे आचरण करणारी, ध्येयाच्या प्राप्तीसाठी कठोर तपश्चर्या करणारी. पौराणिक कथेनुसार, भगवान शिवाला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी पार्वतीने कठोर तप केले.या तपश्चर्येतून तिची अढळ इच्छाशक्ती,संयम आणि ध्येयनिष्ठा प्रकट झाली.

आजच्या वेगवान जीवनात ब्रह्मचारिणी देवीचेचे हे रूप विशेष अर्थपूर्ण वाटते.क्षणात यश मिळावे,लगेच प्रसिद्धी मिळावी आणि प्रयत्नांपेक्षा परिणाम महत्त्वाचा ठरावा, अशी आक्राळलेली मानसिकता समाजास धोक्याची ठरते.

शशिकांत म.तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

आजच्या सामाजिक माध्यमांनी तर या प्रवृत्तीला आणखी वेग दिला आहे.अशा काळात ब्रह्मचारिणी देवी सांगते.यशाचा कुठलाही शॉर्टकट नसतो; त्यासाठी अविश्रांत श्रम,निरंतरता, संयम आणि ध्येय होई पर्यत स्वस्थ न बसण्याची तयारी असावी लागते.

तपश्चर्या म्हणजे केवळ उपवास किंवा देहाला कष्ट देणे नव्हे. आपल्या ध्येयासाठी मनावर,इंद्रियावर नियंत्रण ठेवणे, मोहांवर मात करणे, अडचणी आल्या तरी प्रयत्नाने सोडणे आणि स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे,ही आधुनिक काळातील तपश्चर्या आहे. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासातील सातत्य, तरुणांसाठी कौशल्यविकास, महिलांनी स्वतःलाच कमी न लेखणे, शेतकऱ्यांसाठी प्रतिकूल परिस्थितीतही श्रम आणि उद्योजकांसाठी अपयशातून पुन्हा उभे राहण्याची जिद्द या सगळ्यांत ब्रह्मचारिणी देवीचे रूप दिसते.

तिच्या हातातील जपमाळ एकाग्रतेचा संदेश देते.जिचा आज मोठा अभाव आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा प्रचंड स्फोट झाला आहे; स्मार्टफोन्स, समाजमाध्यमे आणि सततच्या नोटीफीकेशन्स मुळे माणसाचे लक्ष एका ठिकाणी टिकत नाही.अशा वेळी ब्रम्हचारीणी देवीच्या हातातली जपमाळ म्हणजे जणू मनाला सांगणारी खूण.

एकाग्र व्हा, स्वतःशी संवाद साधा आणि अंतर्मुख होऊन आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा. आलेल्या परिस्थितीशी दोन हात करा. तर हातातील कमंडलू साधेपणा आणि आत्मसंयमाचे प्रतीक मानता येईल.आजची गरज आणि लालसा यांच्यातील फरक ओळखणे हीदेखील



आजच्या काळाची मोठी गरज बनली आहे.

ब्रह्मचारिणीचे रूप स्त्रीशक्तीच्या दृष्टीनेही प्रेरणादायी आहे. तिच्या सामर्थ्याचा आधार बाह्य आवरणात नाही, तर आत्मविश्वास आणि इच्छाशक्तीत सुप्त वास करणारा आहे. स्त्रीला स्वतःच्या शिक्षणासाठी, करिअरसाठी, स्वावलंबनासाठी किंवा आयुष्यातील निर्णयांसाठी संघर्ष करावा लागत असेल,तर तिच्या या प्रवासात ब्रह्मचारिणीची ध्येयनिष्ठा प्रेरणा देऊ शकते. देवीची ओटी भरत असतांना सामाजीक सुरक्षतेचे बळ सुद्धा मागावे. समाजाने स्त्रीला केवळ त्यागाचे प्रतीक न मानता तिच्या स्वप्नांना आणि आकांक्षांना समान महत्त्व देणे, हा या उपासनेचा आधुनिक सामाजिक अर्थ आहे.

ब्रह्मचारिणी आपल्याला आणखी एक महत्त्वाचा धडा देते.तो म्हणजे संयम. म्हणजे कमजोरी नव्हे; संयम ही अशी शक्ती आहे. रागाच्या क्षणी स्वतःला आवरणे, अपमानाला तात्काळ प्रत्युत्तर न देता योग्य मार्ग निवडणे, मोहाच्या क्षणी विवेक जागा ठेवणे आणि संकटाच्या काळात निर्णयक्षमता न गमावणे,हे खरे सामर्थ्य आहे.

म्हणून या नवरात्रात ब्रह्मचारिणी देवीच्या रुपात पूजा करताना केवळ आरती करून थांबण्याऐवजी एक सामाजिक संकल्प करण्याची गरज बनली आहे. जीवनाच्या खडतर वाटेवर चालत असताना एखादे ध्येय निश्चित करा, त्यासाठी दररोज थोडा वेळ द्या, मोबाईल आणि अनावश्यक व्यसनांवर नियंत्रण मिळवा शुर्चिभूत राहून आपल्या परिसरातील एखाद्या गरजू व्यक्तीला शिक्षण किंवा कौशल्य मिळवण्यासाठी मदत करा.कारण स्वतःच्या जीवनात शिस्त आणणे आणि दुसऱ्याच्या जीवनात संधी निर्माण करणे, हीच ब्रह्मचारिणीच्या संदेशाची खरी सामाजिक फलश्रुती आहे.

नवरात्रातील दुसरे रूप म्हणून ब्रह्मचारिणी देवी जणू आपल्याला सांगते;ध्येय मोठे असो वा छोटे, त्याच्या दिशेने टाकलेले सातत्यपूर्ण पाऊलच शेवटी यशाची वाट बळकट करते. श्रद्धेतील तपश्चर्या जेव्हा जीवनातील शिस्त बनते आणि व्यक्तिगत साधना जेव्हा सामाजिक संवेदनशीलतेत रूपांतरित होते, तेव्हाच देवीची उपासना अर्थपूर्ण ठरते.

देवीसमोर लावलेली जपमाळ हातात असण्यापेक्षा तिच्या प्रत्येक मण्यासारखा एक-एक चांगली संकल्पमाळ आपल्या कृतीत उतरू दे.हीच ब्रह्मचारिणी देवीच्या चरणी खरी प्रार्थना.हे ब्रम्हचारिणी देवी, तुज्या तपाचे सामर्थ्य थोडे भक्तांना प्रदान कर. तुझ्या दरबारात मंद तेवत असलेल्या नंदादीपाने भक्तांच्या मनातील अंधःकार दूर सार.

- ९१३०८३५४५८

# घटस्थापना : भारतीय संस्कृती, कृषी परंपरा आणि आध्यात्मिक उपासनेचा महाउत्सव

हिंदू धर्मात आणि भारतीय संस्कृतीत शारदीय नवरात्रोत्सवाला एक अनन्यसाधारण आणि अत्यंत पवित्र असे स्थान आहे. मुळात हिंदू परंपरेत वर्षातून दोन वेळा देवीची विशेष आराधना केली जाते–एक म्हणजे वसंत ऋतूत येणारे चैत्र नवरात्र आणि दुसरे शरद ऋतूत येणारे आश्विन महिन्यातील शारदीय नवरात्र. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंत चालणाऱ्या या उत्सवाची नांदी 'घटस्थापना' किंवा 'कलश स्थापनेने' होते. हा सण केवळ एक धार्मिक विधी नसून, तो निसर्गाच्या चक्राशी, कृषी संस्कृतीशी आणि मानवी जीवनाच्या विकासाशी अतिशय खोलवर जोडलेला एक कृतज्ञता सोहळा आहे.

**घटाचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वः** घटस्थापनेचा शब्दशः अर्थ 'मातीच्या घटाची (कलशाची) स्थापना करणे' असा होतो. मानवी संस्कृतीच्या वाटचालीत मातीच्या घटाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. जेव्हा मानवाने भटके जीवन सोडून शेती करायला आणि एका जागी वस्ती करायला सुरुवात केली, तेव्हा त्याला अन्नधान्य आणि दूधदुभते साठवण्यासाठी भांड्यांची गरज भासू लागली. अग्नी आणि चाकाचा शोध लागल्यानंतर कुंभारांनी मातीला आकार देऊन उपयुक्त आणि सुबक पात्रे घडवली. कालांतराने लोखंड, तांबे, पितळ अशा धातूंचा शोध लागला, तरीही धातूंच्या भांड्यांत दही-ताक यांसारखे पदार्थ ठेवल्यास रासायनिक प्रक्रिया होत

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

असल्याने मातीच्या भांड्यांचे महत्त्व अबाधित राहिले. याच मातीच्या घटाला आपल्या पूर्वजांनी पूजनीय मानले. घटाचा गोलाकार आकार हा अनंत आकाशाचे आणि ब्रह्मांडाचे प्रतिनिधित्व करतो, तर त्यात सामावलेले जल हे नवनिर्मितीचे आणि शुद्धतेचे प्रतीक मानले जाते. पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धतीत घराण्यांचे कुलाचार अत्यंत काटेकोरपणे पाळले जात असत. काळानुरूप विभक्त कुटुंब पद्धती आली असली, तरी मूळ संकल्पना आजही अनेक घरांमध्ये अत्यंत श्रद्धेने जपली जाते.

**पूजेची शास्त्रोक्त मांडणी आणि विधीः** घटस्थापनेचा प्रत्यक्ष विधी अत्यंत शास्त्रोक्त, सोपा आणि निसगार्शी थेट जोडलेला आहे. सर्वप्रथम घरातील देवघराची किंवा पूजेच्या ठिकाणाची स्वच्छता करून तिथे रांगोळी काढली जाते आणि चौरंग किंवा पाट मांडला जातो. त्यावर दोन पत्रावळी किंवा परडी ठेवून त्यात शुद्ध काळी माती पसरवली जाते. ही माती सुपीकतेचे प्रतीक असते. या मातीत गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा यांसारखी सात किंवा नऊ प्रकारची धान्ये (सप्तधान्ये) पेरली जातात. या धान्याच्या मध्यभागी पाण्याने भरलेला तांब्याचा किंवा मातीचा कलश (सुगड) ठेवला जातो. कलशाला कुंकवाची पाच किंवा सात बोटे ओढली जातात. या पवित्र कलशात अक्षता, सुपारी, नाणे, कापूर, वेलची, लवंग आणि दुर्वा टाकल्या जातात. कलशाच्या तोंडावर आंब्याची किंवा अशोकाची पाच पाने ठेवून त्यावर लाल ओढणीत (चुन्नी) गुंडाळलेले श्रीफळ (नारळ) विराजमान केले जाते. या श्रीफळालाच देवीचा मुखवटा मानून हळद-कुंकू, फुले आणि हार अर्पण केले जातात. या घटाच्या शेजारीच नऊ दिवस अखंड तेवत राहील असा नंदादीप लावला जातो. दीप म्हणजे प्रकाश आणि प्रकाश हे अज्ञानाचा अंधार दूर करणाऱ्या ज्ञानाचे प्रतीक आहे. काही घरांमध्ये नंदादीपासाठी केवळ तिळाच्या तेलाचा वापर केला जातो. रोज देवीला वेगवेगळ्या रंगांची फुलांची माळ अर्पण करण्याची प्रथा असून, त्यातही तिळाच्या फुलांच्या माळेला विशेष महत्त्व दिले जाते. अशा एकूण नऊ माळा घटावर सोडल्या जातात.

**मुहूर्त, तिथी आणि यंदाची (२०२६) घटस्थापनाः** कोणत्याही मंगल कार्याप्रमाणे घटस्थापनेसाठी वेळेचे आणि मुहूतार्चे विशेष महत्त्व शास्त्रात सांगण्यात आले आहे. हा विधी प्रतिपदेच्या पहिल्या तृतीयांश भागात करणे सर्वाधिक शुभ मानले जाते. पंचांगानुसार तिथीच्या क्षय किंवा वृद्धीमुळे नवरात्र आठ किंवा दहा दिवसांचेही असू शकते. यंदाच्या घटस्थापनेचा विशेष विचार केल्यास, यावर्षी रविवार, ११ ऑक्टोबर रोजी घरोघरी घटस्थापना केली जात आहे. दाते पंचांगकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दिवशी 'वैधृति योग' असला तरीही पहाटे ४ वाजून ५६ मिनिटांपासून ते दुपारी १ वाजून ३५ मिनिटांपर्यंत कधीही घटस्थापना करता येणार आहे. विशेष म्हणजे यंदा सप्तमी तिथीची वृद्धी झाल्याने नवरात्र नऊ ऐवजी दहा दिवसांचे असणार आहे. त्यामुळे देवीस रोज एक याप्रमाणे दहा माळा अर्पण कराव्यात आणि वृद्धी असलेल्या दिवशी दोन स्वतंत्र माळा अर्पण कराव्यात. अखंड नंदादीप जर वाऱ्याने किंवा काजळी काढताना चुकून विझला, तर त्यात कोणतेही अशुभ मानू नये; तो दीप पुन्हा श्रद्धेने प्रज्वलित करावा. अनेक भाविक नवरात्रीचे सर्व दिवस कडक उपवास करतात, मात्र ते शक्य नसल्यास पहिल्या आणि शेवटच्या दिवशी किंवा किमान अष्टमीच्या दिवशी उपवास करण्याची प्रथा आहे.

**वैज्ञानिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनः** या संपूर्ण प्रक्रियेमागे अत्यंत सखोल असा वैज्ञानिक दृष्टिकोन दडलेला आहे. पावसाळा संपून हिवाळ्याची चाहूल लागण्याच्या या काळात शेतातील नवीन पीक हाती आलेले असते. बळीराजा सुखावणारा हा काळ असतो. घटाच्या खाली पेरलेल्या धान्याला नवरात्रीच्या दिवसांत पाणी आणि दिव्याच्या उष्णतेने जे अंकुर फुटतात (ज्याला 'अंकुरारोपण' म्हणतात), ते निसर्गाच्या पुनरुत्पादक शक्तीचे आणि सुजलाम सुफलामतेचे जिवंत प्रतीक असते. अखंड दीप आणि कलशातील पाण्यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होऊन वातावरण अत्यंत पवित्र आणि सकारात्मक बनते. या दिवसांत देवीच्या शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कूष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्रि, महागौरी व सिद्धिदायिनी या नऊ रूपांची तसेच दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वतीची उपासना केली जाते. काही घरांमध्ये कुमारिकेला देवीचे प्रतीक मानून तिचे पूजन केले जाते आणि तिला भोजन दिले जाते. ललितापंचमी आणि महाअष्टमीच्या दिवशी विशेष पूजा असते. अष्टमीच्या रात्री शिजवलेल्या भाताच्या उकडीपासून देवीचा मुखवटा बनवून घागरी फुंकण्याचीही प्राचीन परंपरा महाराष्ट्रात आहे. सात्त्विक आहार आणि देवीच्या उपासनेमुळे मनाची एकाग्रता साधते आणि शरीराचे शुद्धीकरण होते.

**उत्सवाची सांगता आणि बदलते स्वरूपः** या तपश्चर्येची सांगता विजयादशमीला म्हणजेच दसऱ्याला होते. शेवटच्या दिवशी होमहवन करून त्यात कोहळा अर्पण केला जातो, ब्राह्मण आणि सुवासिनींना भोजन दिले जाते. दसऱ्याच्या दिवशी आपट्याच्या पानांची (सोन्याची) पूजा करून, एकमेकांना देऊन या उत्सवाची सांगता होते. पूर्व भारतात हा सण भव्य दुर्गा पूजेच्या रूपात साजरा होतो, तर उत्तर भारतात रावणाचे दहन करून वाईटावर चांगल्याच्या विजयाचा उत्सव साजरा केला जातो. आजच्या आधुनिक काळात नवरात्रीचे स्वरूप काहीसे बदलले आहे. त्यात व्यावसायिकता आली आहे, गरबा आणि दांडियाच्या नावाखाली लाऊडस्पीकरवरील गाण्यांचे प्रस्थ वाढले आहे. असे असले तरी, घटस्थापनेचा मूळ गाभा हा संयम, पावित्र्य, निसर्गाप्रती कृतज्ञता आणि आदिशक्तीच्या उपासनेचाच आहे. नवरात्रीतील या घटाचे दर्शन म्हणजेच निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील अद्वैत भावाचे दर्शन होय.

महाराष्ट्राप्रमाणेच संपूर्ण भारतात नवरात्रोत्सव अत्यंत भक्ती आणि उत्साहाने साजरा केला जातो, परंतु प्रत्येक राज्याची संस्कृती आणि परंपरा वेगळी असल्याने 'घटस्थापना' आणि नवरात्रीचे स्वरूप तिथल्या स्थानिक परंपरेनुसार बदलते. मूळ उद्देश आदिशक्तीच्या (स्त्री-शक्तीच्या) जागरणाचाच असला, तरी साजरी करण्याची पद्धत भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेली आहे. पूर्व भारतात, विशेषतः पश्चिम बंगालमध्ये नवरात्रोत्सव 'दुर्गा पूजा' म्हणून ओळखला जातो. येथे महाराष्ट्रासारखी वैयक्तिक घरोघरी घटस्थापना करण्यापेक्षा सार्वजनिक आणि भव्य 'पंडाल' (मंडप) उभारण्यावर जास्त भर असतो. पश्चिम भारतात गुजरात (गरबा आणि गरबी) असते. गुजरातमध्ये नवरात्र म्हणजे अफाट ऊर्जा, नृत्य आणि देवीच्या आराधनेचा सुरेख संगम असतो. येथे घटस्थापनेचे स्वरूप थोडे वेगळे असते, ज्याला तिथे 'गरबी' म्हणतात.

उत्तर भारतात नवरात्रीत देवीच्या उपासनेसोबतच प्रभू रामचंद्रांच्या जीवनावर आधारित 'रामलीला' प्रामुख्याने साजरी केली जाते. दक्षिण भारतात घटस्थापना आणि नवरात्रीचे स्वरूप अतिशय विलोभनीय आणि वेगळे असते. तिथे ज्ञान, संपत्ती आणि शक्तीच्या देवतांची (सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती) प्रत्येकी तीन दिवस पूजा केली जाते. पूर्व भारतात कला आणि भावनेचा आविष्कार, पश्चिमेत नृत्याचा उत्सव, उत्तरेत मर्यादा पुरुषोत्तम रामाचा आदर्श आणि दक्षिणेत ज्ञान व साधनेची पूजा अशा विविध रूपांत भारतामध्ये घटस्थापना आणि नवरात्र साजरी केली जाते. विविधतेतून एकता साधणारा हा खऱ्या अर्थाने भारताचा महाउत्सव आहे.

- ९५६१५९४३०६

# विकासाच्या शर्यतीत आपण निसर्गाला गमावत आहोत का?

सिमेंटचे जाळे वाढत आहे, भूजल पातळी घटत आहे.विकासाच्या शर्यतीत आपण निसर्गाला गमावत आहोत का? असा प्रश्न सध्या निर्माण होत आहे.

विकासाच्या अंधाधुंद शर्यतीत आपण खरोखरच निसर्गाला मोठ्या प्रमाणावर गमावत आहोत.आजच्या काळात होणारा विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास यातील

प्रा. सुषमा ओझा
नागपूर

सीमारेषा अतिशय पुसट होत चालली आहे.

रस्ते, बांधकामे आणि उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर जंगले तोडली जात आहेत, ज्यामुळे अनेक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नामशेष होत आहेत. जंगलतोडीमुळे हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे, ज्यामुळे जागतिक तापमानवाढ आणि अवकाळी पावसाची समस्या निर्माण झाली आहे. भूजल पातळी घटत आहे, नद्यांचे प्रदूषण वाढत आहे आणि शेतजमिनी सिमेंटच्या जंगलात रूपांतरित होत आहेत.प्रदूषित हवा, पाणी आणि खाण्याच्या सवयींमुळे नवीन आजार आणि आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत.

आज शहरीकरणामुळे, घरांमध्ये, अंगणांमध्ये आणि रस्त्यांच्या कडेला उरलेल्या जमिनीवरही सिमेंट टाकले जात आहे. आपण आपल्या सुविधा आणि भिंतींचे संरक्षण करण्यासाठी जमिनीला सिमेंट लावत आहोत, पण त्याचा निसर्गावर आणि भूजलावर होणाऱ्या परिणामाचा आपण कधी विचार करतो का?

जेव्हा जमिनीचा मोठा भाग सिमेंटने झाकला जातो, तेव्हा पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी नाल्यांमध्ये वाहून जाते. याचा परिणाम भूजलाच्या नैसर्गिक पुनर्भरणावर होऊ शकतो. आज आपण पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल, विहिरी, हातपंप आणि नद्यांवर अवलंबून आहोत. जर भूजलाचा उपसा असाच वाढत राहिला आणि त्याचे पुनर्भरण कमी झाले, तर भविष्यात पाण्याची समस्या अधिक गंभीर



होऊ शकते. जमीन हा केवळ जमिनीचा एक भाग नाही, तर जलसंधारण आणि हिरवळीचा आधार आहे. जर आपण आपल्या सभोवतालची मोकळी जमीन काढून टाकली, तर झाडे, वनस्पती आणि हिरवळीसाठीची जागाही कमी होईल. यावर उपाय म्हणजे विकास थांबवणे नव्हे, तर निसर्गाशी संतुलन साधणे होय. शक्य असेल तिथे आपण काही जमीन मोकळी ठेवली पाहिजे, झाडे लावली पाहिजेत आणि पावसाचे पाणी साठवण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

आज आपल्याला हे ठरवायचे आहे की, आपल्याला आपल्या सभोवताली केवळ सिमेंटचे जंगल हवे आहे की हिरवळ आणि पाण्याने समृद्ध पर्यावरण हवे आहे.

लक्षात ठेवा, जर आपण आज माती आणि पाणी वाचवले, तरच आपण भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करू शकू.

पृथ्वी वाचवा,
पाणी वाचवा, हिरवळ वाढवा!

विकास आवश्यक आहे, पण तो निसर्गाच्या विनाशाच्या किमतीवर न करता शाश्वत विकास डोळ्यासमोर ठेवून केला पाहिजे, जेणेकरून आपले आणि भावी पिढीचे भविष्य सुरक्षित राहील.

-९८२२५०४५३६

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# पदवीधरांच्या प्रश्नांची सोडवणूक हेच माझे प्राधान्य : ॲड. अभिजित वंजारी

## गोंदियाच्या प्रचार सभेत कार्यकर्त्यांनी केला विजयाचा संकल्प

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**
पदवीधरांचे प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न आणि कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविणे ही माझी भूमिका राहिली आहे. पदवीधरांना भेडसावणाऱ्या समस्यांची सोडवणूक करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. पदवीधरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी माझा लढा यापुढेही सुरूच राहील, असे प्रतिपादन नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ॲड. अभिजित गोविंदराव वंजारी यांनी केले.

आगामी महाराष्ट्र विधान परिषद नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवार, १० ऑक्टोबर रोजी गोंदिया येथे महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पदवीधर मतदारसंघातील विविध प्रश्न, आगामी निवडणुकीचे नियोजन, प्रचाराची दिशा आणि संघटनात्मक तयारी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने निवडणुकीला सामोरे जात विजय मिळविण्याचा संकल्प केला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट), विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ (विमाशि) तसेच विविध शिक्षक व कर्मचारी संघटनांच्या पाठिंब्याने ॲड. अभिजित वंजारी हे निवडणूक लढवत आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांमध्ये समन्वय राखून पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा झाली.



यावेळी माजी आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष गोपालदास अग्रवाल, जिल्हाध्यक्ष अमर वराडे, काँग्रेसचे नेते प्रफुल्ल अग्रवाल, नगराध्यक्ष सचिन शेंडे, शहर काँग्रेस अध्यक्ष रविकांत बोपचे, गोंदिया तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश अंबुले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती राजकुमार (पप्पू) पटले, बँकेचे सदस्य अमर रंगारी, चंद्रकुमार छोटे, सुनील भालेराव, अजय अग्रवाल, महिला काँग्रेसच्या रूपाली उके, अनुसूचित जाती विभागाचे शहराध्यक्ष मनीष चौव्हाण, रुपेश नशिने आणि सुरेश चौरागडे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्याने आपापल्या भागातील पदवीधर मतदारांशी संपर्क साधावा, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि महाविकास आघाडीची भूमिका त्यांच्यापर्यंत पोहोचवावी, यावर बैठकीत भर देण्यात आला. तसेच सर्व घटक पक्षांनी समन्वयाने काम करून संघटनात्मक ताकद वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

गोंदिया येथील या बैठकीत महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे निवडणुकीच्या तयारीला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. पदवीधरांच्या प्रश्नांवर केंद्रित प्रचार आणि संघटनात्मक समन्वयाच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जाण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली.

**शिक्षकांच्या हक्कांसाठीचा लढा सुरूच राहणार!**

गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव येथे महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून आगामी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठीचा लढा हा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, त्यांच्या न्याय्य मागण्यांना मान्यता मिळेपर्यंत तो सातत्याने सुरूच राहील. पदवीधर, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने मांडून त्यांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करणे ही आपली जबाबदारी आहे, अशी भूमिका या बैठकीच्या निमित्ताने आ. अभिजित वंजारी यांनी मांडली.

## बनपुरी - गोंडेगाव जि. प. सर्कलमधील शेकडो युवकांचा शिवसेनेत प्रवेश

### शिवसेनेचा विचारधारा व विकासाचे कार्य तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवा - राज्यमंत्री आशिष जयस्वाल



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारांचा वारसा आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत रविवार दिनांक ११ ऑक्टोंबर २०२६ रोजी पारशिवनी तालुक्यातील बनपुरी - गोंडेगाव जिल्हा परिषद सर्कलमधील शेकडो युवकांनी राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी बोलतांना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले,उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अनेक लोक शिवसेनेशी जोडले जात आहेत. पक्षाची विचारधारा आणि विकासाचे कार्य तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने पर्यन्त करावेत.शिवसेनेचा प्रचार व प्रसार करुन पक्षांचे संघटन अजून मजबूत करावे, असे आव्हान यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी युवकांना केले.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या रामटेक येथिल जनसंपर्क कार्यालयात झालेल्या शिवसेना पक्षप्रवेशामध्ये पारशिवनी तालुक्यातील बनपुरी - गोंडेगाव जिल्हा परिषद सर्कल मधील बखारी, नांदगाव, गरंडा, गवना, वाघोडा, सावली, सिंगोरी, मेहंदी गावातील आशिष गावंडे, पंकज मांगे, संदीप वासाडे, प्रफुल डवरे, अनिकेत डवरे, हंसराज बावणे, सौरभ मारबते, आदित्य शिंदेमेश्राम, प्रवीण डवरे, स्वप्नील गावंडे, आकाश शिंदेमेश्राम, पंकज गोंडळी, दुर्गेश केवट, ईश्वर बागडे, पवन माहूरकर, राहुल धुडस, तुषार गावंडे, गुरुदेव बाजनघाडटे, गणेश खडे, भूषण चिकनकर, ओम पुरे, राजेश बागडे, तरुण काळे, भूषण सहारे, प्रिन्स इंगोले, हिमांशू खोब्रागडे, धीरज सहारे, अभिषेक सहारे, बंटी आमले, सुरज केळेकर, शुभम सहारे, अमर मेश्राम, सौरभ बाजनघाटे, राहुल गावंडे, अंकित राळे, शुभम गावंडे, महेंद्र चेपटकर, प्रज्वल टाले, अखिल गजभिये, धिरज फलके, पवन माहूरकर, नैतिक गावंडे, आकाश ठाकरे, रोहन बोरकर, धिरज खेवले, हर्ष चिखले, प्रदीप मेश्राम, देवेंद्र सहारे, अक्षय पाटील, नयन बागडे, भुणेश्वर डोंगरे, स्वप्निल उमाळे यांनी प्रवेश केला.यावेळी राज्यमंत्री जयस्वाल सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले.

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना नागपूर कलाकार कट्टातर्फे भावपुर्ण श्रद्धांजली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर कलाकार कट्टातर्फे रविवारी काचीपुरा चौकातील विष्णुजी की रसोई येथील डॉ. गिरीश गांधी सभागृहात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. श्रद्धांजली सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार श्रीकृष्ण चांडक होते. तर अभिनेते देवेंद्र दोडके, प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कार्यकारी मंडळ उपाध्यक्ष नरेश गडेकर यांची मंचावर उपस्थिती होती.



नटसम्राट नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाच्या बळावर देश-विदेशात अमीट ठसा उमटवला आहे. आपल्या दमदार अभिनयाने त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीला जागतिक स्तरावर ओळख मिळवून दिली, अशी भावना देवेंद्र दोडके यांनी व्यक्त केली वयाच्या १६व्या वषार्पासून नाना पाटेकर यांच्या व्यक्तिमत्वाचा माझ्यावर प्रभाव होता असे सांगत विष्णू मनोहर यांनी नटसम्राटमधील त्यांचा प्रवेश कसा मनाला भावला आणि त्याच्यावर आधारित 'टू बी ऑर नॉट टू बी'चे डाएट विषयक विडंबन काव्य कसे तयार केले याची आठवण सांगितली. हे काव्य सादर करून त्यांनी नाना पाटेकर यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली.

नरेश गडेकर म्हणाले, नाना पाटेकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील स्वतःच्या अटींवर काम करणारे, स्पष्टवक्ते आणि शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व होते. कोमल हृदयाच्या नानांना समाजासाठी खूप काही करण्याची इच्छा होती. त्यांच्या भूमिका अजरामर आहेतच, त्याचप्रमाणे त्यांचे सामाजिक कार्यही कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राचा खरा नटसम्राट हरपला, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना श्रीकृष्ण चांडक म्हणाले, नाना पाटेकर यांचे जीवन झगमगत्या चित्रपटसृष्टीत वावरूनही अत्यंत साधे होते. अभिनयाची परिसीमा गाठणाऱ्या नाना यांनी अनेकदा चित्रपटातील मुख्य नायकापेक्षाही अधिक मानधन मिळवले. मात्र, या पैशाचा उपयोग त्यांनी सामाजिक कार्यासाठी केला. समाजाप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि दातृत्व हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे वैशिष्ट्य होते. नाना पाटेकर यांच्यासारखा कलावंत हरपणे, हे संपूर्ण चित्रपटसृष्टीचे दुर्दैव आहे. प्रसाद इंगळे, मुकूंद वसुले, राकेश खाडे, विजय जत्थे, संजय वलीवकर, अविनाश सोनुले, प्रसाद इंगळे, नरेंद्र शिंदे, देवेंद्र लुटे यांनी देखील नाना पाटेकर यांच्याशी संबंधित आठवणी, त्यांच्यासोबतचे अनुभव आणि विविध प्रसंगांतील रंजक किस्से यांना उजाळा दिला.

मो. सलीम यांनी पुरुष, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, तिरंगा, प्रहार संस्थेसाठीचे कार्य,नाम फाउंडेशनचे कार्य यांचा उल्लेख करत सूत्रसंचालन केले.

## खड्डयांनी शेतकऱ्यांची कोंडी, रस्ते दुरुस्त करा!

### भिवापूर-चिखलापार, भिवापूर-चिखली मार्गाची दुरवस्था, कृषी उत्पन्न बाजार समितीचे बांधकाम विभागाला निवेदन

**दै,. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
रस्त्यांवरील खड्डयांनी शेतकऱ्यांचा प्रवास खडतर केला असून, आता शेतमाल बाजारपेठेत पोहोचवतानाही संकटांचा सामना करावा लागत आहे. भिवापूर-चिखलापार आणि भिवापूर-चिखली या मार्गांवरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली आहे.

भिवापूर-चिखलापार मार्गावरून जड वाहनांची वाहतूक होत असल्याने रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या मार्गावरील गावांतील शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी भिवापूरच्या बाजारपेठेत आणतात. मात्र, जागोजागी पडलेल्या खड्डयांमुळे शेतमालाची वाहतूक करणे जिकिरीचे झाले आहे. खड्डयांमुळे वाहनांतील शेतमालाची पोती खाली पडण्याच्या घटना घडत असून अपघातांचाही धोका वाढला आहे.

ऑक्टोबर २०२६ पासून नवीन शेतमालाचा हंगाम सुरू होत आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. भिवापूरची बाजारपेठ शेतकऱ्यांसाठी सोयीची व किफायतशीर असताना खराब रस्त्यांमुळे त्यांनाच आर्थिक आणि वाहतुकीच्या संकटाला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बाळू इंगोले यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळातर्फे ९ ऑक्टोबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्या श्रीमती कापरे यांना निवेदन देऊन दोन्ही मार्गांवरील खड्डयांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली. आता बांधकाम विभाग या मागणीची कितपत दखल घेतो आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रत्यक्षात कधी पावले उचलतो, याकडे लक्ष लागले आहे.

## स्व. श्रावणजी रामटेककर व स्व. देवकाबाई रामटेककर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपक्रम, नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, औषधवाटप व चष्म्यांचे वितरण

### प्रयास जैन कलार ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे महाआरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
जैन कलार समाजाच्या वतीने स्वर्गीय श्रावणजी रामटेककर व स्व. देवकाबाई रामटेककर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रयास जैन कलार ज्येष्ठ नागरिक मंडळ, जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ व जिल्हा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. रविवारी ४ ऑक्टोबर रोजी रेशीमबाग, नागपूर येथील जैन कलार समाज भवनात हे शिबिर पार पडले. या शिबिरासाठी आयोजकांना प्रायोजक व समाजातील मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले.



या महाआरोग्य शिबिराचे प्रायोजक त्रिलोकजी श्रावणजी रामटेककर यांच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी जैन कलार समाज मंडळाचे अध्यक्ष चंद्रशेखर आदमने, प्रयासचे संस्थापक अध्यक्ष अनिल अहिरकर, जिल्हा समिती नागपूरचे अध्यक्ष श्रीकांत शिवणकर, संस्थापक अध्यक्ष किरण गोसेवाडे, उपाध्यक्ष शशिकांत समर्थ, विलास हरडे तसेच राजाभाऊ टाकसाळे यांच्यासह अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रायोजक त्रिलोकजी श्रावणजी रामटेककर यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

शिबिरात इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे डॉ. रहांगडाले, डॉ. त्र्यंबक बुरकुले तसेच त्यांच्या वैद्यकीय चमूने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली. यावेळी गरजू नागरिकांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले, मोफत चष्म्यांचे वितरणही करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांसह समाजातील नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव विजय समर्थ यांनी तर संचालन मंडळाचे अध्यक्ष प्रकाश मासुरकर यांनी केले.शिबिराच्या यशस्वितेसाठी दत्तात्रय हरडे, राजेश समर्थ, अजय हेटेवार, दामोदर आदमने, अशोक पेशणे, अरुण रहाटे, राजीव फटिंग, जयंत हरडे, डॉ. रवींद्र बेरागडे, दिलीप डाबरे, राजू बारूरकर, भूषण हरडे यांच्यासह रजनीताई चिमूरकर, कुसुमताई भरणे, आशाताई समर्थ, नंदाताई हरडे तसेच संपूर्ण विश्वस्त मंडळाने विशेष परिश्रम घेतले. समाजातील ज्येष्ठ नागरिक व गरजू व्यक्तींना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

**थोडक्यात**

## किशोर कुमार यांच्या पुण्यतिथीनिमित्त नागपुरात संगीतमय श्रद्धांजली उद्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
शतकातील महान गायक, अष्टपैलू अभिनेते आणि आपल्या अजरामर गीतांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे स्वरसम्राट स्व. किशोर कुमार यांच्या ३९ व्या पुण्यतिथी निमित्ताने किशोर कुमार ऑल इंडिया फॅन्स क्लबच्यावतीने संगीतमय श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता. शंकरनगर येथील साई सभागृहात हा कार्यक्रम रंगणार आहे.



किशोर कुमार यांच्या अवीट गोडीच्या गीतांची आठवण जागवणाऱ्या या कार्यक्रमात नागपूर मधील उत्कृष्ट गायक आणि गायिका आपल्या सुरेल सादरीकरणातून किशोरदांना संगीतमय आदरांजली अर्पण करणार आहेत. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पुण्याचे प्रसिद्ध किशोरभक्त रवी गायकवाड यांची उपस्थिती राहिल.

आपल्या मधुर आवाजातून किशोर कुमार यांच्या लोकप्रिय गीतांचा सुरेल नजराणा ते नागपूरकर रसिकां समोर सादर करणार आहेत. किशोरदांच्या सदाबहार गीतांनी संगीत प्रेमींना मंत्रमुग्ध करणारी ही मैफल रसिकांसाठी एक अविस्मरणीय संगीतमय अनुभव ठरणार आहे. किशोर कुमार यांनी आपल्या बहारदार गायकीने हिंदी चित्रपटसृष्टीत अढळ स्थान निर्माण केले. रोमँटिक, भावपूर्ण, विनोदी आणि जीवनाचा आनंद व्यक्त करणाऱ्या त्यांच्या विविध गीतांनी अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहे. आजही त्यांची गाणी तितक्याच आवडीने ऐकली जातात. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या संगीताचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला कोणतेही प्रवेश शुल्क नसून सर्व संगीत प्रेमींना विनामूल्य प्रवेश देण्यात येणार आहे. नागपूरकर संगीत प्रेमींनी जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मैफलीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

## चाणक्यपुरम येथे नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात

### विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल; भाविकांसाठी भव्य आयोजन, चाणक्यपुरम परिसरातील नागरिकांचे उत्सवाच्या यशस्वीतेसाठी सामूहिक प्रयत्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
शिव पंचायतन मंदिर, चाणक्यपुरम, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे सलग २२ व्या वर्षी नवरात्रोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले असून, विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी उत्सवाची रंगत वाढणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही देवीच्या आराधनेसह सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे. नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमांची सुरुवात रविवार, ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेने झाली. सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी गोंधळ, मंगळवारी स्वर साधना जागरण, बुधवारी २ नाटक, तर गुरुवारी फॅन्सी ड्रेस, मोनो ॲक्टिंग आणि मिमिक्री स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी रास गरबा, शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी रास रंग नृत्य स्पर्धा, तर रविवार, १८ ऑक्टोबर रोजी गरबा कार्यक्रम होणार आहे. यानंतर सोमवारी घट विसर्जन व मिरवणूक, मंगळवारी दसरा स्नेहसंमेलन, बुधवारी आनंद मेळावा, गुरुवारी विविध क्रीडा स्पर्धा आणि शुक्रवारी बक्षीस वितरण व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

बहुतेक सांस्कृतिक कार्यक्रम रात्री ७.३० वाजल्यापासून सुरू होणार आहेत. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने लहान मुलांपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना सहभागी होता यावे, यासाठी विविध उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे. उत्सवात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महा.अंनिस कार्यकर्त्यांची जिल्हा बैठक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
आमदार निवास येथे महाराष्ट्र अंनिस कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. महा.अंनिसचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष संजय बनसोडे हे महाराष्ट्र दौऱ्यावर असताना त्यांनी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचि महत्त्वाची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत संजय बनसोडे यांनी आपल्या संबोधनात अंनिसच्या कार्याला गति देण्याचे दृष्टीने मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणाने उपस्थित कार्यकर्त्यामधे चैतन्य निर्माण झाले. कार्यकर्ते सोबत केलेल्या संवादातून तरूणांना सहभागी करण्याच्यादृष्टीने नजिकच्या काळात ऐक भव्य कार्यक्रम आयोजित करण्याचे निश्चित झाले.

समारोपाच्या भाषणात जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांनी नेहमी प्रमाणे जोश पुर्ण भाषण करून कार्यकर्त्यांनी जबाबदारी घेऊन काम करण्याची आवश्यकता प्रतिपादीत केली.

बैठकिला राज्य प्रधान सचिव सुरकार, राज्य उपाध्यक्ष संजय शेंडे,जोविनि राज्य कार्यवाह आदरणिय कविता मते, नलिनी शेरकुरे, तसेच हिंगणा शाखा, कोराडी शाखा, नागपूर शाखा इत्यादी शाखेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात

## शिवसेना (उबाठा) रामटेक तालुका प्रमुख हेमराज चोखांद्रे यांचा काँग्रेस पक्षप्रवेश



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रामटेक तालुका प्रमुख हेमराज चोखांद्रे यांचा आज मा.खासदार श्यामकुमार बर्वे व माजी राज्य मंत्री राजेंद्र मुलक यांच्या हस्ते व अन्य काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश झाला. हेमराज चोखांद्रे हे एक उच्च शिक्षित व्यक्तिमत्व असून त्यांनी यापूर्वी विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थेत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले असून राजकीय क्षेत्रात देखील त्यांनी विविध पदे भूषविली असून समाजात त्यांनी आपली एक उत्तम ओळख निर्माण केलेली आहे. ते यापूर्वी ग्राम पंचायत मनसरचे सदस्य होते तर त्यांच्या पत्नी योगेश्वरी चोखांद्रे या हेमराज चोखांद्रे यांच्या मार्गदर्शनात सरपंच म्हणून थेट जनतेतून निवडून आलेल्या असतांना त्यांनी आपल्या कार्यकाळात अत्यंत समाजोपयोगी व लोकोपयोगी कार्य केलेले आहेत. एक आदर्श महिला सरपंच म्हणून त्यांचे कार्य अजूनही उल्लेखनीय आहे.

हेमराज चोखांद्रे यांनी यापूर्वी विविध निवडणुकांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेले असून त्यांच्या अनुभवांचा फायदा येणाऱ्या काळात काँग्रेस पक्षाला मोठ्या प्रमाणात होईल. असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी केला आहे.तर देशाची व राज्याची सध्यास्थिती बघता पुढील काळात काँग्रेस शिवाय पर्याय नाही त्यामुळे आपण पुढील आयुष्यात काँग्रेस पक्षाकरिता अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करू असे विचार हेमराज चोखांद्रे यांनी व्यक्त केले.

## पाऊस लांबल्याने पिके संकटात! कृषी पंपांना १२ तास अखंडित वीज द्या!

### अन्यथा महावितरण कार्यालयात ठिय्या मांडणार: अभिजित कुडे यांचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा - धर्मेंद्र शेरकुरे**

चालू वर्षात पाऊस भलताच लवकर निघून गेल्याने आणि पोळा सणानंतरही पावसाची साधी सर न आल्याने वरोरा तालुक्यातील शेतकरी दुष्काळी परिस्थितीचा सामना करत आहेत. अशा नाजूक स्थितीत महावितरण कंपनीने कृषी पंपांचा वीज पुरवठा १२ तासांवरून थेट ८ तासांवर आणल्यामुळे आणि सततच्या विजेच्या लपंडावामुळे कापूस उत्पादक व इतर पिके घेणारे शेतकरी तीव्र संकटात सापडले आहेत. विहिरीत व जलप्रकल्पांत पाणी उपलब्ध असूनही विजेअभावी पिके डोळ्यांदेखत वाळत असल्याने, शेतकऱ्यांना पूर्ववत १२ तास सुरळीत वीज पुरवठा करावा, अन्यथा महावितरण कार्यालयात तीव्र 'ठिय्या आंदोलन' छेडले जाईल, असा थेट व आक्रमक इशारा शेतकरी नेते अभिजित प्रभाकरराव कुडे यांनी दिला आहे. वरोरा तालुक्यातील नागरी भागातील नागरी, उखर्डा, केळी, येवती, चिकणी, शेगाव आणि हिवरा यांसह अनेक गावांतील कृषी पंपांचा वीज पुरवठा महावितरणने अचानक कपात करून ८ तासांवर आणला आहे. पाऊस लवकर गेल्यामुळे शेतात ओल उरलेली नाही. सध्याचा १५ ते २० दिवसांचा काळ कापूस व इतर पिकांच्या ओलितासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक आहे. पाणी देण्यासाठी विहिरींमध्ये पुरेसा साठा आहे, मात्र महावितरणच्या गलथान कारभारामुळे 'पाणी असूनही पिके तहानलेली' अशी अत्यंत संतापजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. महावितरणकडून दिवसा व रात्री मिळणारा वीज पुरवठाही अत्यंत अनियमित असून विजेचा लपंडाव सतत सुरू असतो. यामुळे शेतकऱ्यांचे सिंचनाचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे.

"शेतकरी आधीच निसर्गाच्या लहरीपणाने होरपळला आहे. त्यातच महावितरणची ही अन्यायकारक वीजकपात म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. कापूस पिकाला या १५-२० दिवसांत पाणी मिळाले नाही तर शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होईल. महावितरणने कोणतीही हायगय न करता वरोरा तालुक्यातील सर्व बाधित गावांसाठी कृषी पंपांचा वीज पुरवठा तात्काळ १२ तास सुरळीत करावा. प्रशासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास शेतकरी बांधवांना सोबत घेऊन महावितरणच्या कार्यालयातच ठिय्या आंदोलन करण्यात येईल आणि उद्भवणाऱ्या सर्व परिणामांना महावितरण प्रशासनच जबाबदार राहील." महावितरणने शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता त्वरित १२ तास पूर्ण दाबाने वीज पुरवठा सुरू करावा, अशी आक्रमक मागणी या भागातील संतप्त शेतकरी बांधवांकडूनही केली जात आहे.

## ताराबाई इत्तडवार यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मोहपा येथील रहिवासी (ह.मु. नागपूर, शिलानगर गिट्टीखदान) ताराबाई हरिभाऊ इत्तडवार यांचे वृद्धापकाळाने आज रविवार दि.



११ ऑक्टोबर रोजी सकाळी दुःखद निधन झाले. त्या मृत्युसमयी ८५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर मानकापूर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली तसेच बराच मोठा परिवार आहे. उद्या सोमवार दि.१२ ऑक्टोबर ला सकाळी १० वाजता. मानकापूर घाटावर अंत्य संस्कार करण्यात करण्यात येईल.

# समकालीन कवितेला जनकवी नारायण सुर्वे यांनी वास्तवाचा चेहरा दिला : डॉ. अक्षयकुमार काळे

## युगवाणीच्या नारायण सुर्वे जन्मशताब्दी विशेषांकाचे थाटात प्रकाशन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठी कवितेला आशय, विषय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने वेगळी वाट दाखवणारे जनकवी पद्मश्री नारायण सुर्वे यांनी समकालीन कवितेला वास्तवाचा चेहरा दिला. त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी समाजजीवन आणि समाजपरिवर्तन या दोन महत्त्वाच्या जाणीवा होत्या. कामगार म्हणून जगलेले जीवन, त्यातून आलेली सामाजिक जाणीव आणि मानवकल्याणाची तळमळ यांचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध समीक्षक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले.

जनकवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या युगवाणीच्या विशेषांकाचा प्रकाशन समारंभ नागपुरातील शंकरनगर येथील महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुलाच्या श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. पदव्युत्तर मराठी विभागाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमात डॉ. काळे बोलत होते. मंचावर डॉ. वि. स. जोग, युगवाणीचे संपादक डॉ. श्याम धोंड, पदव्युत्तर मराठी विभागाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव कोमल ठाकरे आणि वि सा संघाचे सरचिटणीस विलास मानेकर उपस्थित होते.

नारायण सुर्वे यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देताना डॉ. काळे यांनी नांदेड येथील साहित्य संमेलनातील भेटीचा तसेच विदर्भ साहित्य संघाच्या परिसरात झालेल्या भेटीचा उल्लेख केला. सुर्वे हे दिलखुलास आणि निर्गवी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा सहवास लाभणे हा आपल्यासाठी महत्त्वाचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले.

सुर्वे यांच्या कवितेत मार्क्सवादी विचारांचा प्रभाव असला, तरी त्यांची कविता मानवकेंद्री होती. ते स्वप्ने पाहत; मात्र त्यांच्या स्वप्नांना वास्तवाची जाणीव आणि निराशेची झालरही होती. कामगार म्हणून जगलेल्या अनुभवांमुळे त्यांच्या कवितेतील सामाजिक जाणीव अधिक ठळक झाली. समकालीन मराठी कवितेत सामाजिक आशय प्रभावीपणे मांडणाऱ्या मोजक्या कवींमध्ये सुर्वे यांचे स्थान महत्त्वाचे असल्याचे डॉ. काळे यांनी नमूद केले.

यानंतर डॉ. वि. स. जोग यांनी युगवाणीचे संपादक डॉ. श्याम धोंड यांनी सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेषांक प्रकाशित करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी कौतुक केले. सुर्वे यांच्या कवितेतील आशयाची ताकद अधोरेखित करताना त्यांनी जाहीरनामासारख्या कवितांचा उल्लेख केला. कार्ल मार्क्सवरील कविता तसेच कोलकाता येथील हातगाडी ओढणाऱ्या श्रमिकांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या कवितेचा विशेष उल्लेख करून सुर्वे यांच्या कवितेची सामाजिक व्याप्ती त्यांनी स्पष्ट केली. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर राजकीय परिस्थितीवर सुर्वे सातत्याने भाष्य करत असत, असेही त्यांनी सांगितले.

युगवाणीचे संपादक डॉ. श्याम धोंड यांनी विशेषांकामागील भूमिका विशद केली. एका जाणकार भाष्यकाराने सुर्वे यांना तिसरे केशवसुत असे संबोधल्याचा उल्लेख त्यांनी केला. विशेषांकात सुर्वे यांच्या कवितांसह त्यांच्या अनुवादित साहित्याचाही समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील अभ्यासकांचे लेख, पूर्वप्रकाशित महत्त्वपूर्ण लेख, सुर्वे यांच्यावरील कविता आणि त्यांची विविध छायाचित्रे यांचा समावेश करून विशेषांक सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. या कामात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

कार्यक्रमात नारायण सुर्वे यांच्या कवितांचे वाचनही करण्यात आले. 'कामगार आहे मी', 'तळपती तलवार', 'शिगवाला' आणि 'आई' या कवितांचे वाचन विनय मोडक यांनी केले तर वैदेही चवरे यांनी 'तुमचंच नाव लिवा' आणि 'चंद्र' या कवितांचे प्रभावी वाचन केले.

पदव्युत्तर मराठी विभागाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव कोमल ठाकरे यांनी प्रास्ताविकातून सुर्वे यांच्या जीवनप्रवासाचा परिचय करून दिला. वृषाली देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**परिसंवादाचे आयोजन**

यानिमित्ताने नारायण सुर्वे यांच्या बहुआयामी काव्यकर्तृत्वाचा वेध घेण्यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध मार्क्सवादी साहित्यचिंतक डॉ. वि. स. जोग अध्यक्षस्थानी होते. अहमदनगर येथील कॉम्रेड डॉ. मेहबूब सय्यद, यवतमाळचे प्रा. पुनीत मानकर आणि वणी येथील डॉ. अजय देशपांडे यांनी परिसंवादात सहभाग घेतला.

डॉ. मेहबूब सय्यद यांनी सुर्वे यांच्या कवितेच्या जडणघडणीचा आढावा घेतला. कामगार वर्गाचे जीवन, त्यांच्या परिसरातील मुस्लिम आणि ख्रिश्चन समाजाचे अनुभव, गिरणी कामगारांचे प्रश्न आणि कम्युनिस्ट चळवळीतील संघर्ष यांचे प्रतिबिंब सुर्वे यांच्या कवितेत उमटत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. पुनीत मातकर यांनी 'कवी नारायण सुर्वे आणि मिलेनियल्सची पिढी' या विषयावर भाष्य केले. सुर्वे यांचा जीवनप्रवास थक्क करणारा असून, त्यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याचे भांडवल न करता सामाजिक वास्तवाला कवितेच्या केंद्रस्थानी ठेवले, असे ते म्हणाले. तत्कालीन मराठी कवितेतील जीवनाभिमुखता, सुर्वे यांच्या कवितेतील रोखठोकपणा आणि सुबोध अभिव्यक्ती ही त्यांच्या काव्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. अजय देशपांडे यांनीही सुर्वे यांच्या कवितेचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला. त्यांचा सुर्वे यांच्या काव्यावरील लेख युगवाणीच्या विशेषांकात समाविष्ट करण्यात आला आहे.

# काळीज पिळवटून टाकणारी घटना! शिवकुंडात बुडून दहावीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू; दोन बहिणींचा लाडका भाऊ हरपला!

## सुटीचा दिवस ठरला आयुष्याचा अखेरचा दिवस!



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

मित्रांसोबत फिरायला गेलेल्या १६ वर्षीय पीयूषचा वाघोली येथील शिवकुंडातील पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने पवनी गावावर शोककळा पसरली असून, एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आनंद क्षणात हिरावला गेला आहे.

पीयूष विजय जिजोते हा जयसेवा आदर्श हायस्कूल, पवनी येथे इयत्ता दहावीत शिक्षण घेत होता. शाळेला सुटी असल्याने तो सकाळी वडील विजय जिजोते यांच्यासोबत रेडिमेड कपड्यांच्या विक्रीसाठी आसपासच्या गावांत जात असे. कुटुंबाला हातभार लावणारा आणि अभ्यासात हुशार असलेला पीयूष दुपारी घरी परतला. मात्र, सायंकाळी मित्रांसोबत फिरायला गेलेला पीयूष पुन्हा घरी परतणार नाही, याची कल्पनाही कोणाला नव्हती. वाघोली येथील शिवकुंडात पोहण्याचा मोह झाल्याने पीयूषने उंच दगडी कड्यावरून पाण्यात उडी घेतली. मात्र, पाण्यात उडी घेतल्यानंतर तो पुन्हा वर आलाच नाही. क्षणार्धात घडलेल्या या घटनेने मित्रांमध्ये घबराट पसरली. त्यांनी तातडीने त्याच्या कुटुंबीयांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच देवलापार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पीयूषचा मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, देवलापार येथे पाठविण्यात आला.

**दोन बहिणींचा लाडका भाऊ कायमचा हरपला!**

पीयूष हा कुटुंबातील तीन अपत्यांपैकी एकुलता एक मुलगा होता. त्याला दोन मोठ्या बहिणी आहेत. ज्या घरात पीयूषच्या भविष्याची स्वप्ने रंगवली जात होती, त्याच घरावर आज दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आई-वडिलांचा आधार, दोन बहिणींचा लाडका भाऊ आणि कुटुंबाच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक असलेला पीयूष काळाच्या पडद्याआड गेला.

दहावीच्या परीक्षेची तयारी करून उज्ज्वल भविष्य घडविण्याच्या वयात पीयूषचे आयुष्य संपल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. एका क्षणाच्या निष्काळजीपणाची किती मोठी किंमत मोजावी लागू शकते, याची जाणीव करून देणारी ही घटना आहे.

निसर्गरम्य ठिकाणी फिरायला जाताना पाण्याची खोली आणि सुरक्षिततेचा अंदाज न घेता पाण्यात उडी मारणे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे शिवकुंडासारख्या ठिकाणी पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर करण्यात येत आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत सावली (खुर्द) येथे शेतकरी मार्गदर्शन शिबिर संपन्न

## संत्रा पिकाचे व्यवस्थापन, ठिबक सिंचन, कीड- रोग नियंत्रण आणि हवामानाधारित कृषी सल्ल्याबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शासकीय योजनांचीही दिली माहिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सेवा संकल्प अभियानांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या मॉडेल व्हिलेज उपक्रमांतर्गत सावली (खुर्द), ता. कळमेश्वर येथे ६ ऑक्टोबर रोजी कृषी महाविद्यालय, नागपूर यांच्या वतीने शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. शेतकऱ्यांना स्थानिक परिस्थिती नुसार योग्य कृषी तंत्रज्ञानाची माहिती देणे, शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करणे, हवामानाधारित कृषी सल्ल्याविषयी जनजागृती करणे तसेच विद्यापीठामार्फत शेतकरी सक्षमीकरण व कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालय, नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय इलोरकर होते. प्रमुख उपस्थितांमध्ये डॉ. विष्णुकांत टेकाळे, प्राध्यापक (कृषी विस्तार), डॉ. विनोद राऊत, प्राध्यापक (उद्यानविद्या), डॉ.सचिन वानखेडे, विषय विशेषज्ञ (कृषी हवामानशास्त्र), केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर; डॉ. हर्षा मेंढे, सहाय्यक प्राध्यापक (कृषी विस्तार), दीपाली कुंभार, तालुका कृषी अधिकारी, कळमेश्वर आणि डॉ. रासळ, वरिष्ठ पर्यवेक्षक यांचा समावेश होता.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजय इलोरकर यांनी शाश्वत कृषी उत्पादन, उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि शेतीची उत्पादकता व नफा वाढविण्यासाठी विद्यापीठाने विकसित केलेल्या तसेच शिफारस केलेल्या कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. स्थानिक हवामान, जमिनीची स्थिती आणि पिकांच्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेती अधिक फायदेशीर आणि शाश्वत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. सावली (खुर्द) परिसरातील शेतकरी प्रामुख्याने संत्रा पिकाची लागवड करीत असल्याने डॉ.विनोद राऊत यांनी संत्रा पिकाच्या व्यवस्थापनावर विशेष मार्गदर्शन केले. दुष्काळसदृश परिस्थितीत संत्रा बागांची काळजी कशी घ्यावी, पाण्याचे योग्य नियोजन कसे करावे, ठिबक सिंचनाचा प्रभावी वापर कसा करावा तसेच पिकावरील रोगांचे व्यवस्थापन कसे करावे, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांचेही त्यांनी निराकरण केले. कृषी विज्ञान केंद्र आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या वतीने सहभागी झालेले डॉ. सचिन वानखेडे यांनी सध्याच्या पर्जन्यमानातील तूट आणि आगामी हवामानाच्या अंदाजाविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. बदलत्या हवामानानुसार शेतीचे नियोजन करणे, पिकांच्या संवेदनशील अवस्थेत योग्य खबरदारी घेणे आणि हवामानाधारित कृषी सल्ल्याचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विज्ञान केंद्रामार्फत उपलब्ध असलेल्या विविध हवामानाधारित कृषी सल्ला सेवांची माहितीही त्यांनी दिली. तालुका कृषी अधिकारी दीपाली कुंभार यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती देताना महिला शेतकरी व शेतमजुरांसाठी उपलब्ध असलेल्या योजनांवर विशेष भर दिला. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. डॉ. राहुल वडस्कर यांनी कापूस आणि संत्रा पिकांवरील विविध किडींची ओळख, त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना आणि एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. पिकांचे नियमित निरीक्षण, योग्य वेळी उपाययोजना आणि शास्त्रीय पद्धतींचा अवलंब केल्यास पिकांचे नुकसान कमी करता येते, याबाबत त्यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सपना वानखेडे (बाविस्कर), नोडल अधिकारी, मॉडेल व्हिलेज आणि डॉ. राहुल वडस्कर, सहाय्यक प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. डॉ. सपना वानखेडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन केले. डॉ. हर्षा मेंढे आणि कृषी महाविद्यालयातील ग्रामीण कृषी कार्यानुभव (फ्अहए) कार्यक्रमांतर्गत कार्यरत विद्यार्थ्यांनी शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

कृषी उत्पादन आणि कृषी विस्तार उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक कृषी तंत्रज्ञान पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मॉडेल व्हिलेजमध्ये कार्यरत असलेले फ्अहए विद्यार्थी ऋषिकेश पाटील, हनुमान लोथे, थोराजी घोरबंड, दीपक करासकर, अनुश्री तायडे, आर्या हटकर, भूमिका गजभिये, कुणाल अमाने, तन्मय कडू, तुषार कुंभारकर, सानिधी लटाये आणि तेजस पाटील यांनी मोलाचे योगदान दिले. शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, हवामानविषयक माहिती आणि शासकीय योजनांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले.

# विद्यार्थी-पालक सुसंवाद : भविष्याचा पाया

डॉ. सचिन चव्हाण
रामटेक, जि. नागपूर

आजचे युग हे ज्ञान, तंत्रज्ञान आणि स्पर्धेचे युग आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत शिक्षणाचे स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके आहेत, इंटरनेट आहे, माहितीचे अमाप भांडार आहे; मात्र या सगळ्यांच्या गर्दीत त्यांना समजून घेणारा, त्यांच्या भावना जाणून घेणारा आणि त्यांच्या मनातील प्रश्नांना आपलेपणाने प्रतिसाद देणारा संवाद कमी होत चालला आहे, ही चिंतेची बाब आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वय जितका महत्त्वाचा आहे, तितकाच विद्यार्थी आणि पालक यांच्यातील सुसंवादही अत्यंत गरजेचा आहे. कारण शिक्षण केवळ गुण मिळविण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचा संस्कारमय प्रवास आहे.

संवाद म्हणजे केवळ बोलणे नव्हे, तर एकमेकांना समजून घेणे होय. पालकांनी मुलांना सूचना देणे, चुका दाखवून देणे किंवा अभ्यासासाठी आग्रह धरणे म्हणजे सुसंवाद नव्हे. मुलांच्या मनातील भावना, भीती, अपेक्षा, स्वप्ने आणि अडचणी शांतपणे ऐकून घेणे हा खऱ्या संवादाचा पाया आहे. अनेकदा पालक मुलांच्या शैक्षणिक प्रगतीची चौकशी करतात; परंतु त्यांच्या भावनिक स्थितीची विचारपूस करायला विसरतात. 'आज शाळेत काय शिकला?' या प्रश्नाइतकाच 'आज तुला सर्वांत आनंद कशामुळे झाला?' किंवा 'काही अडचण आली का?' हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. अशा छोट्या प्रश्नांतून मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित आणि विश्वासपूर्ण वातावरण मिळते.

आज अनेक घरांमध्ये अभ्यास, परीक्षा, गुण, स्पर्धा आणि करिअर यांभोवतीच मुलांच्या आयुष्याची चर्चा फिरताना दिसते. चांगले गुण मिळविणे महत्त्वाचे असले, तरी गुणपत्रिका म्हणजे विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन नव्हे. प्रत्येक विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता, आवड, क्षमता आणि शिकण्याची गती वेगवेगळी असते. एखादा विद्यार्थी गणितात उत्तम असतो, तर दुसरा भाषा, कला, क्रीडा किंवा सर्जनशील विचारांत प्रावीण्य मिळवतो. त्यामुळे मुलांची तुलना इतर विद्यार्थ्यांशी करण्याऐवजी त्यांच्या स्वतःच्या प्रगतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तुलना आत्मविश्वास कमी करू शकते; परंतु प्रोत्साहन आणि सकारात्मक संवाद आत्मविश्वास वाढवू शकतात.

पालकांचे प्रेम अनेकदा मुलांच्या भवितव्याविषयीच्या काळजीतून व्यक्त होते. मात्र, ही काळजी जेव्हा सततच्या सूचना, अवास्तव अपेक्षा किंवा कठोर नियंत्रणाच्या स्वरूपात प्रकट होते, तेव्हा मुलांमध्ये मानसिक दडपण निर्माण होऊ शकते. प्रत्येक वेळी मुलांनी पालकांच्या अपेक्षांनुसारच वागावे, अशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही. मुलांना प्रश्न विचारण्याचे, स्वतःचे मत मांडण्याचे आणि चुका करून त्यातून शिकण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. चूक झाली म्हणून अपमान करण्याऐवजी त्या चुकीमागील कारण समजून घेणे अधिक परिणामकारक ठरते. मुलांना शिस्त आवश्यक आहेच; पण शिस्तीला संवादाची आणि समजुतीची जोड मिळाली, तर तिचे रूपांतर आत्मशिस्तीत होते.




विद्यार्थीदशा ही शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदलांची अवस्था आहे. या काळात मैत्री, अभ्यासाचा ताण, परीक्षेची भीती, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, स्वतःच्या क्षमतेविषयीच्या शंका आणि भविष्याची चिंता अशा अनेक गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनात सुरू असतात. अशावेळी पालकांनी केवळ मार्गदर्शकाची भूमिका न बजावता विश्वासू मित्र आणि संवेदनशील श्रोता होणे गरजेचे आहे. मुलांनी एखादी समस्या सांगितली, तर लगेच दोष देणे किंवा उपदेश सुरू करणे टाळावे. प्रथम त्यांचे म्हणणे पूर्ण ऐकून घ्यावे. कधी कधी समस्येचे तात्काळ उत्तर देण्यापेक्षा मन मोकळे करण्याची संधी देणे अधिक उपयुक्त ठरते. मुलांना आपले म्हणणे घरात शांतपणे ऐकले जाते, ही जाणीव असणे त्यांच्या भावनिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे आहे.

सुसंवाद वाढविण्यासाठी मोठ्या उपाययोजनांची आवश्यकता नसते. दररोज काही वेळ मोबाईल, दूरचित्रवाणी आणि इतर व्यत्यय बाजूला ठेवून कुटुंबातील सदस्यांनी एकत्र बसावे. दिवसातील अनुभव, आनंद, अडचणी आणि उद्याच्या योजनांविषयी मनमोकळेपणाने बोलावे. मुलांच्या प्रश्नांना गांभीयार्ने घ्यावे आणि त्यांच्या मतांचा आदर करावा. त्याचबरोबर पालकांनीही स्वतःच्या भावना योग्य शब्दांत व्यक्त कराव्यात. संवाद हा एकतर्फी नसून परस्परांचा असतो. पालकांनी मुलांना ऐकावे आणि मुलांनीही पालकांच्या अनुभवांचा, संघर्षांचा व अपेक्षांचा आदर करावा. परस्पर आदर, विश्वास आणि सहकार्य यांमधूनच नात्यांमध्ये आत्मीयता निर्माण होते.

या प्रक्रियेत शाळेची भूमिकाही महत्त्वपूर्ण आहे. शिक्षकांनी पालकसभांचा उपयोग केवळ गुणपत्रिका दाखविण्यासाठी किंवा तक्रारी मांडण्यासाठी न करता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर चर्चा करण्यासाठी करावा. पालकांना मुलांच्या वयाशी संबंधित मानसिक गरजा, अभ्यासाच्या सवयी, भावनिक आरोग्य आणि डिजिटल माध्यमांच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करता येईल. विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी शिक्षक आणि पालक यांच्यात नियमित संवाद राहिल्यास अडचणींचे वेळीच निराकरण करता येते. मात्र, या प्रक्रियेत विद्यार्थ्यालां केवळ चर्चेचा विषय न बनवता त्यालाही स्वतःचे मत मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थ्याच्या विकासासाठी तयार होणाऱ्या प्रत्येक निर्णयात त्याचा सहभाग महत्त्वाचा आहे.

पालकांनी हेही लक्षात घ्यावे की मुलांचे भविष्य घडविताना त्यांच्यावर स्वतःची अपूर्ण स्वप्ने लादू नयेत. त्यांना योग्य पयार्यांची माहिती द्यावी, त्यांच्या आवडी समजून घ्याव्यात आणि निर्णयक्षम बनण्यासाठी मदत करावी. स्वावलंबी व्यक्तिमत्त्व घडविणे हे पालकत्वाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी प्रेमाबरोबरच विश्वास, मार्गदर्शनाबरोबरच स्वातंत्र्य आणि अपेक्षांबरोबरच स्वीकार आवश्यक आहे. मुलांच्या यशात आनंद मानावा; पण अपयशाच्या वेळीही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. कारण अपयश ही आयुष्याची समाप्ती नसून नव्याने शिकण्याची संधी असते.

शेवटी, विद्यार्थी आणि पालक यांच्यातील सुसंवाद ही केवळ कौटुंबिक गरज नसून निकोप समाजनिर्मितीची पायाभूत अट आहे. संवादातून विश्वास निर्माण होतो, विश्वासातून आत्मविश्वास वाढतो आणि आत्मविश्वासातून जबाबदार व्यक्तिमत्त्व घडते. उद्याचा सुजाण नागरिक आजच्या घरात घडत असतो. त्यामुळे घरातील वातावरण प्रेमळ, संवादशील आणि समंजस असणे अत्यावश्यक आहे. मुलांना महागड्या वस्तू, आधुनिक सुविधा आणि उत्कृष्ट शैक्षणिक साधने देणे उपयुक्त असले, तरी त्यांच्यासाठी उपलब्ध करून दिलेला वेळ, लक्षपूर्वक ऐकून घेणारे कान आणि विश्वासाने धरलेला हात यांची जागा कोणतीही वस्तू घेऊ शकत नाही. मुलांशी संवाद साधण्यासाठी वेळ काढणे म्हणजे केवळ त्यांच्या वर्तमानात सहभागी होणे नव्हे, तर त्यांच्या भविष्याची पायाभरणी करणे होय. म्हणूनच प्रत्येक पालकाने मुलांना केवळ 'काय बनायचे आहे?' असे विचारण्यापूर्वी 'तुला काय वाटते?' हे विचारावे. कारण मुलांच्या स्वप्नांना दिशा देण्यासाठी प्रथम त्यांच्या मनापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. संवादाचा हा सेतू जितका भक्कम असेल, तितके विद्यार्थी, कुटुंब आणि समाजाचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल.

**- (लेखक शिक्षण अभ्यासक आहेत.)**

## शब्द

अज्ञाताच्या भयावह अंधारात अधिक भयावह वाटते नवी पाऊलवाट
मिनमिनणाऱ्या अंधुक प्रकाशात पडती पाऊल  शांत स्थिर वादळाचे
तूज्या शब्दात जग धावत होते अष्टपैलू रत्नांच्या साखळीत
कदाचित माझा भ्रम असेल
अग्नी आणि फुल यांचा मेळ बसत नाही उदास स्तब्धतेत
मला थोपटवीत अक्ख्या जगाला सलाम करते तुझी वाणी
बागेतली सारी फुले चावा घेतील आज तूझ्या मुक्या वाणीत
शब्द फिरले आज काळजात
नट होऊनी जगले सारे पक्षी
फितूर मात्र झाले नाही
मस्तकावर लावला टिळा उद्या भिरभिरनाऱ्या प्रश्नांचा
हेवा वाटतो तूझ्या अश्वमेध शब्दांचा
शब्दांची जात प्रत्येकाला नसती ओळखायची
जीव लावून असे कसे सोडायचे अप्सरेच्या  कंठस्थ मिठीला

**- प्रा. डॉ. वैशाली भांडारकर**
**राजकमल तिडके महाविद्यालय, मौदा**
**मो. ८३८०८९३७०६**



## अस्तित्व

अगदी पहाटेच झाली इथे तिघांची सलगी. मखमली सोनचाफा, मारवा अन् बकुळी.... निघून गेली यामिनी.... अन् रश्मी मिठीत आली. ही भेट मिलनाची, अन् उधळणं सुगंधाची.... अवघ्या परसबागेत दरवळतोय यांचाच मंद गंध...मन अधीर होतंय अन अलगद रेशमी पाकळीजवळ पावले वळतात.... एकदा ओंजळीत सोनचाफा आलाय की अवघं गात्र सुगंधित. पाकळी उमलतांना प्रस्त्रवला सोनचाफा..... जणू...सैरंध्रीच्या प्रीतीसाठी दरवळतो सोनचाफा..... मनाचा गाभाऱ्यातलं आतलं सौख्य तेव्हाच उमजतं.... आणि एक शांततेचा उसासा दीर्घकाळ टिकतो.... अलगद काही ओळी ओठांवर येतात.... मी आज आले,वस्तीत सुगंधाच्या.. मन न्हावून गेले, प्रेमात केशराच्या.... सोहळा सुगंधाचा नव्याने बहरला आज..... मी अनुभवते जणू ऋतूंचा मधुमास...

सोनचाफा..श्रीहरीच्या चरणी तू अधिकच सुरेख दिसतोय.... श्रीलक्ष्मीच्या समीप अर्थातच विष्णुप्रियाला तू फारच प्रिय.....झाडावरचं तुझं बहरणं, गंधाळणं अन माझं तुझ्याच सौंदर्यात, गंधात एकरूप होणं... तुला वेणीत माळायचं आणि मन लावून जपायचं.... इतकंच नको रे...!

'आयुर्वेदात लाभदायी तुझ्या पाकळीचा रंग '...
'आरोग्यदायी तुझी पाने, सोबतीला तुझा सुगंध'.....
'बहरल्या तुझ्या अस्तित्वाची कुणी ना जागा घ्यावी..... तुझ्या समर्पणाने मेदिनी तृप्त व्हावी...'

देव्हाऱ्यात तुझं गौरीच्या चरणी समर्पित होणं... सोबतच हलक्या केशरी रंगातून पाकळीचं निरागस सौंदर्य टिकवणं....देवळाच्या गाभाऱ्यातून निर्माण होणाऱ्या आध्यात्मिक पावित्र्यतेचा सुरेख मिलाप....म्हणजेच सोनचाफा.....

बकुळी...... जणू धरेतली शुभ्र तारका.... तुझ्या अस्तित्वाचा अवघ्या सृष्टीला अभिमान... साधेपण- अंतर्मनातील निखळता- आतली सौम्यता- अनुरागाचं प्रतीक बनून संयमाने कर्तृत्व देखणं करणं..... हे कधी मिरवावं लागत नाही... ते आपल्या गुणधमार्ने कळतंय....

'आध्यात्मिक जीवनाचा पाया 'नम्रता' हाच आहे हे तुझ्या अस्तित्वातून उमजतंय.....
'आता सरून गेले.... ते स्वप्न तारुण्याचे'....
'तुझ्या गंधात होते भिजले, धागे गजऱ्याचे....'



बकुळी.... पहाटेचा मंद गारवा तुला जसा स्पर्शतो.... तसा हलकासा स्वर निनादतो.... तुझ्या अन् धरेच्या भेटण्याचा....या भेटीच्या माध्यमातून आयुष्य जगणं सहज समजतं.... मेघात विरून जातो मृगांक तुझ्यासाठी.... चांदणं धरेत येतं.. तुझ्या अस्तित्वासाठी.... म्हणतात ना....! "आयुष्य जगावं बकुळीसारखं...स्वतःचं साधेपण विशेष गुणधर्मातून दर्शवावं....तुला पारखावं.....तुझ्यातलं अनमोल सौंदर्य अवघ्या सृष्टीला कळावं..... अगदी संयमतेत स्वअस्तित्वात तुझं दरवळणं मनाला दिलासा देतंय...

'बकुळीची माळ...सुगंधाचे पाणी....सांडले धरेत....ऐका तिची कहाणी.....'
"पानापानातून सळसळतोय.... हिरव्या रंगाचा साज..."
"नाही कुणास कळला बकुळीच्या गंधाचा राज..".... असाच निवांत उसासा घेऊन बकुळ निरंतर दरवळतेय....

मारवा......(रान तुळस)
तुझा परिमळ....तुझ्यातल्या जांभळ्या मंजिरीचे सौंदर्य अवघ्या धरित्रीचा अलंकार... तुज्यातला रसरसलेला आयुर्वेद गुणधर्म....तुझं धरेला अलगद अर्पण होणं....तुझ्या पानांच्या सुवासाने सारे व्यंजन रुचकर आणि लाभदायी ... तुझी देठे आणि मुळे आरोग्यास गुणकारी.....सुकली जरी मंजिरी तरीही आयुर्वेद सांगतो 'मारवा' अत्यंत बहुगुणी....

'आज या तिघांचं स्वतंत्र अस्तित्व लिहितांना जणू रेषांवर -शब्दांवर सुगंधाचे दवं ओघळत आहे असा काहीसा भास होतोय....
शेवटी एकच सांगावंसं वाटतंय....
हे सृष्टीतील सुगंध 'अव्यय' आहेत....
"गंध देऊन गेले....."
"निर्माल्य सुकलेले"...
"आता जपायचे हे "...
"आयुष्य राहिलेले"....

**- वृषाली वानखडे, अमरावती**
**मो. ९९२१४२४१२५**

# इंपॅक्ट प्लेअर : क्रिकेटचा समतोल बिघडवणारा प्रयोग?

***फलंदाजीला अतिरिक्त बळ, गोलंदाजांवर वाढता दबाव आणि अष्टपैलू खेळाडूंच्या भवितव्याचा प्रश्न!***

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटमध्ये बदल हा काही नवा नाही. कसोटीपासून एकदिवसीय क्रिकेटपर्यंत आणि त्यानंतर ट्वेन्टी-२०च्या धडाकेबाज विश्वापर्यंत या खेळाने अनेक स्थित्यंतरे अनुभवली. मात्र, आधुनिक क्रिकेटमध्ये दाखल झालेला इंपॅक्ट प्लेअर हा नियम केवळ रणनीतीतील बदल नसून खेळाच्या मूलभूत समतोलावर परिणाम करणारा प्रयोग ठरू शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने २०२३ च्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये हा नियम लागू केला. त्यानुसार संघाला सामन्याच्या परिस्थितीनुसार एका खेळाडूच्या जागी पयार्यी खेळाडूचा वापर करता येतो. त्यामुळे संघाला गरजेनुसार अतिरिक्त फलंदाज किंवा गोलंदाज मैदानात उतरवता येतो. वरकरणी ही व्यवस्था संघांसाठी फायदेशीर आणि प्रेक्षकांसाठी मनोरंजक वाटते; पण तिच्या दूरगामी परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे.

**फलंदाजीला बळ, गोलंदाजीवर ताण**

इंपॅक्ट प्लेअरमुळे संघाला फलंदाजी आणि गोलंदाजीसाठी स्वतंत्र विशेषज्ञ खेळाडू वापरण्याची अधिक मुभा मिळते. परिणामी, आधीच फलंदाजांना अनुकूल असलेल्या ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये मोठ्या धावसंख्यांची शक्यता वाढू शकते. अर्थात, यासाठी सपाट खेळपट्ट्या, लहान सीमारेषा, आक्रमक फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणावरील निर्बंध हे घटकही कारणीभूत आहेत. त्यामुळे प्रत्येक मोठ्या धावसंख्येचे खापर या एका नियमावर फोडता येणार नाही. तरीही, फलंदाजीला अतिरिक्त पर्याय मिळत असताना गोलंदाजांसाठी परिस्थिती अधिक कठीण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फलंदाज आणि गोलंदाज यांच्यातील संघर्ष हा क्रिकेटचा आत्मा आहे. फलंदाजांनी चौकार-षटकार मारावेत, पण गोलंदाजांनीही आपल्या कौशल्याने त्यांना रोखण्याची संधी मिळाली पाहिजे. अन्यथा क्रिकेट हा केवळ धावांचा उत्सव बनण्याचा धोका आहे.

**अष्टपैलू खेळाडूंचे महत्त्व कमी होणार?**

या नियमावरील सर्वांत महत्त्वाची टीका अष्टपैलू खेळाडूंच्या भवितव्याशी संबंधित आहे. पूर्वी संघरचना करताना फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या खेळाडूंना विशेष महत्त्व दिले जात असे. मात्र, पर्यायी खेळाडूची सुविधा उपलब्ध असल्यामुळे संघांना स्वतंत्र फलंदाज आणि स्वतंत्र गोलंदाज निवडणे अधिक सोयीचे वाटू शकते.

रोहित शर्मा यानेही २०२४ मध्ये या नियमामुळे अष्टपैलू खेळाडूंच्या विकासावर परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली होती. हा मुद्दा गांभीर्याने घेण्याची गरज आहे. कारण आजच्या सोयीसाठी अष्टपैलू खेळाडूंच्या कौशल्यविकासाकडे दुर्लक्ष झाले, तर उद्या भारतीय क्रिकेटला त्याची किंमत मोजावी लागू शकते.

**नवोदित खेळाडूंच्या विकासाचे काय?**

आयपीएल ही केवळ मनोरंजनाची स्पर्धा नसून राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवणारे व्यासपीठही आहे. तरुण खेळाडूंना फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रांत स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणे महत्त्वाचे आहे. मात्र, खेळाडूचा वापर केवळ त्याच्या एका कौशल्यापुरता मर्यादित राहिला, तर त्याच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण होऊ शकतो.

अर्थात, प्रत्येक खेळाडूच्या मर्यादित संधींसाठी इंपॅक्ट प्लेअरच जबाबदार आहे, असे म्हणता येणार नाही. संघाची रणनीती, प्रशिक्षकांचे निर्णय आणि स्पर्धेचे स्वरूप यांचाही त्यावर परिणाम होतो. परंतु या नियमामुळे खेळाडूंच्या भूमिकांमध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**मनोरंजन महत्त्वाचे; पण खेळाचे हित त्याहून मोठे!**

इंपॅक्ट प्लेअरच्या नियमामुळे कर्णधाराला रणनीती बदलण्याची संधी मिळते, पयार्यी खेळाडूंना सहभागाची संधी मिळते आणि सामन्यांमध्ये नवे समीकरण निर्माण होते. ही त्याची जमेची बाजू आहे. त्यामुळे नियम पूर्णपणे निरुपयोगी आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

मात्र, या नियमामुळे धावसंख्या, गोलंदाजांची कामगिरी, अष्टपैलू खेळाडूंचा वापर आणि नवोदितांच्या विकासावर नेमका किती परिणाम होतो, याचे आकडेवारीच्या आधारे मूल्यमापन झाले पाहिजे. गरज भासल्यास नियमात सुधारणा करण्याचा किंवा त्याच्या वापरावर मयार्दा घालण्याचा विचार करता येईल.

क्रिकेटमध्ये फलंदाजाचे वर्चस्व जितके महत्त्वाचे, तितकीच गोलंदाजाची प्रतिकारक्षमताही महत्त्वाची आहे. प्रत्येक खेळाडूला आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली, तरच खेळाचा खरा समतोल टिकेल. इंपॅक्ट प्लेअरचा प्रभाव वाढवताना क्रिकेटमधील इतर खेळाडूंचा प्रभाव कमी होणार नाही, याची काळजी घेणे हीच खरी कसोटी आहे. कारण क्रिकेटचा थरार केवळ धावांच्या डोंगरात नसतो; तो फलंदाज आणि गोलंदाज यांच्यातील अटीतटीच्या संघर्षात असतो.

- ९०९६३७२०८२

## निष्ठा तू परत ये

कुठे हरवलीस निष्ठा, की तू ध्यानस्त आहे?
मैदानात सत्तेच्या, राज-धिंगाणा सुरु आहे.
उरला नाही आदर, जनतेच्या कौलाचा आता,
खुर्चीसाठी नेत्यांनी, विकले इमान आहे.

विचारधारेला खरीदणारे, संपत आले आता,
भरचौकात लोकशाहीचा, लिलाव सुरु आहे.
रोज बदलतात पक्ष हे, लाजेचे वस्त्र सोडुन,
जे काल होते वैरी, ते आज मित्र आहे.

करतात कानाडोळा, मूलभूत समस्येकडे,
नजरेत त्यांच्या फक्त, सत्तेची मलाई आहे.
खोक्यांच्या राशीवर होतात, मोठे करार इथे,
जनतेच्या स्वप्नांवर, यांचा थेट प्रहार आहे.

बाळकडू पाजले, पोसले ज्यांनी यांना,
त्यांच्यासाठीच आज हे, कृतघ्न आहे.
बंदिस्त केले यांनी, त्याग आणि नैतिकतेला,
लाचारीच यांच्या, धमण्यातून वाहत आहे.

झुंडीने हे चालतात, भ्रष्ट  वाटेवर सारे,
स्वाभिमानी लेकरं, तुझ्या प्रतीक्षेत आहे.
कित्येक आहे पदांसाठी, गुलामीत मरणारे,
चारित्र्य जपून लढणारे ही, काही जिवंत आहे.

म्हणून सांगतो निष्ठा, तू मौन धरू नको,
निर्दयी राजकारणाचा, तुला ताबा घेणे आहे.
आश्वासनांतून नको, निष्ठा तू कृतीतून ये,
गद्दार पुढाऱ्यांना, लायकी दाखवायची आहे.

**- प्रा. विलास डोईफोडे, मो. ९११२८५७२९९**

थोडक्यात

## उमरेडमध्ये आज माँ भवानी जागरणाचा भक्तिमय सोहळा

### जय माता दी दुर्गा उत्सव मंडळाच्यावतीने जागरणाचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

नवरात्रोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात उमरेड शहरातील लाल बहादूर शास्त्री चौक, मंगळवारी पेठ येथे जय माता दी दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता माँ भवानी जागरणाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, लाल बहादूर शास्त्री चौक, उमरेड येथे आयोजित या कार्यक्रमात भजन, भक्तिगीते आणि जागरणाचा पवित्र सोहळा पार पडणार आहे. माँ भवानीच्या आराधनेतून भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊजेर्चा अनुभव घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कांस्यपदक विजेत्या विद्या नागपुरे चा लोधी समाजातर्फे जंगी सत्कार

### दक्षिण कोरियातील आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

आदिवासी बहुल नक्षलग्रस्त अतिदुर्गम सालेकसा तालुक्यातील खेडेपार येथील प्रतिभावान खेळाडू विद्या येशुलाल नागपुरे हिने दक्षिण कोरियात आयोजित २०२६ वर्ल्ड तायक्वांदो पुमसे चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत कांस्यपदक पटकावून गोंदिया जिल्ह्यासह महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल लोधी समाजाच्या वतीने तिचा त्यांचा राहतेघरी उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. विद्याने ५२ किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्य पदकावर आपले नाव कोरले. तिच्या या यशामुळे खेडेपार गावासह संपूर्ण गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यावेळी विद्याचे माजी आमदार भेरसिंह नागपुरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आले.

या सत्कार प्रसंगी माजी आमदार तथा गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष भेरसिंह नागपुरे, अखिल भारतीय लोधी, लोधा, लोध अधिकारी-कर्मचारी संघ (आलोक) महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे, लोधी समाज सेवा समिती आमगाव चे संयोजक देवेंद्र मच्छिरके, आलोक महाराष्ट्र प्रदेशचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर दमाहे, आलोक महाराष्ट्र प्रदेश चे मीडिया प्रभारी राजकुमार बसोने, लोधी समाज सेवा समिती आमगाव चे सचिव रोशन गराडे, आलोकचे प्रमोटर ललितकुमार मच्छिरके, प्रदेश संयोजक रोशनलाल लिल्हारे, आलोक चे राष्ट्रीय महिला उपाध्यक्ष सुखवंता बनोठे, दीपा मच्छिरके, भोजवंती लिल्हारे, लोधी समाज सेवा समिती आमगावचे अध्यक्ष जागेश्वर लिल्हारे, युवराज बसोने, आलोकचे संयोजक केवलचंद मच्छिरके, ज्ञानीराम बनोठे, लोधी समाज गोंदियाचे जिल्हाध्यक्ष अशोक नागपुरे, सचिव कृष्णा गहगये, हेमंत मोहारे,आलोक गोंदियाचे नीरज नागपुरे, सचिव रोशन मस्करे, प्रशांत लिल्हारे,अनिल नागपुरे, सुनील लिल्हारे, आशीर्वाद लिल्हारे, रामेश्वर लिल्हारे, खेमलाल माहुले, सूर्यकांत नागपुरे, मानदास बसेना तसेच सुनील नागपुरे आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्या नागपुरेच्या उज्ज्वल यशाचे कौतुक करून तिच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तिच्या मेहनतीतून आणि जिद्दीतून युवा खेळाडूंनी प्रेरणा घ्यावी, असा संदेशही यावेळी देण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर गोंदियाचा झेंडा उंचावणाऱ्या विद्या नागपुरेच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पांढरी मारुती मंदिर येथे दुर्गा उत्सवाचे रौप्य महोत्सव वर्ष

### स्व. प्राचार्य चंपतराव बुटे सर यांचे स्मृती प्रित्यर्थ २००१ ला प्राण प्रतिष्ठान



**दै. सिंहवाणी वृत्त, कोंढाळी**

येथील प्राचीन पांढरी मारुती मंदिर देवस्थानात दुर्गा उत्सवाला २५ वर्ष रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त विविध कार्यक्रम आयोकीत केले आहे. यावर्षी मंदिर सौंदर्यीकरण (बांधकाम) करण्यात आले आहे. स्व. प्राचार्य चंपतराव बुटे सर यांचे स्मृती २००१ ला जयपूर येथून संगमरवर मूर्ती आणून प्राण प्रतिष्ठा करण्यात आली होती. नवरात्र उत्सवा २०२६ ला २५ वर्ष होत आहे. त्यानिमित्ताने मंदिर सौंदर्यकरण करण्यात आले. यावर्षी सकाळी अभिषेक, पूजन पाठ, वाद्य आरती, कार्यक्रम पार पडले. अभिषेक, पूजन कलश स्थापना डॉ. सृजन व डॉ. प्राची सुधीर बुटे, वंदना बुटे, डॉ. सृष्टी प्रदीप ठाकरे अमरावती यांनी केली.

उत्सव आयोजनास रवींद्र ठवळे, देवा ठवळे, महेंद्र पाटील ठवळे,सारंग ठवळे,निकेश ठवळे,अनिकेत ठवळे, पंकज ठवळे, बालू कुंठाळे, वसंता बिसरे, बालाजी ठवळे,परिसरातील, बाल गोपाल,युवा, महिला, सर्व मंडळी नवरात्र उत्सवा करिता सेवा देत आहे. मुलींचा गरबा करिता मेघा व वैष्णवी ठवळे प्रशिक्षण देत आहे. उत्सवामुळे धार्मिक वातावरणनिर्माण झाले असून सर्व मंडळी सोहळ्याचा आनंद घेत आहे.

# कोराडीच्या श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिरात नवरात्रोत्सवाला प्रारंभ

### पहाटेपासूनच भाविकांची मांदियाळी, ७ हजार ५०० घटांच्या दीपज्योती प्रज्वलित, चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली विधिवत पूजा-अर्चना





**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात रविवारी शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पहाटे ४ वाजल्यापासून देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसर 'जय माता दी'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. नवरात्रोत्सवाच्या शुभारंभानिमित्त मंदिरात विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. तसेच ७ हजार ५०० घटांच्या दीपज्योती प्रज्वलित करण्यात आल्या.

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी आई जगदंबेच्या दर्शनासाठी नागपूरसह विदर्भातील विविध जिल्ह्यांतून भाविक कोराडी येथे दाखल झाले होते. पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दिवसभर भाविकांनी देवीच्या स्वयंभू रूपाचे तसेच पूर्ण शृंगारातील रूपाचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

महाराष्ट्राचे महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात उपस्थित राहून आई जगदंबेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विधिवत पूजा-अर्चा करून त्यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली.

यावेळी त्यांनी सर्वांच्या सुखी आणि समृद्ध जीवनासाठी प्रार्थना केली. प्रत्येक कुटुंबात आनंद, समाधान आणि आरोग्य नांदावे, शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील सर्व घटकांना प्रगतीच्या नव्या संधी मिळाव्यात, तसेच आई जगदंबेच्या आशीवार्दाने प्रत्येकाला नवी ऊर्जा, आत्मविश्वास आणि संकटांवर मात करण्याचे बळ मिळो, हीच भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी ज्योतीताई बावनकुळे, पुत्र संकेत बावनकुळेही उपस्थित होते.

नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी मंदिरात धार्मिक विधी आणि पूजाअर्चा पार पडली. या पवित्र पर्वानिमित्त सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आनंद नांदावा, समाजात शांतता व सलोखा कायम राहावा, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

**भाविकांसाठी निःशुल्क भोजनाची व्यवस्था**

नवरात्रोत्सवासाठी कोराडी येथे येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर मंदिर प्रशासनाने भर दिला आहे. मंदिर परिसराच्या मागील बाजूस भाविकांसाठी निःशुल्क भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे दूरवरून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दिलासा मिळत आहे.

ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग भाविकांना सुलभतेने दर्शन घेता यावे, यासाठी विशेष दर्शनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**मंदिर प्रशासन, पोलीस आणि स्वयंसेवकांकडून नियोजन**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासन, पोलीस प्रशासन आणि स्वयंसेवकांकडून भाविकांच्या सुविधांसाठी विविध व्यवस्था करण्यात आल्या आहेत. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी नियंत्रित करणे, रांगा व्यवस्थित ठेवणे आणि मंदिर परिसरात शांतता व सुव्यवस्था राखणे यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत.

शारदीय नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. सात हजार ५०० घटांच्या दीपज्योतींनी उजळलेला मंदिर परिसर आणि देवीच्या जयघोषाने निर्माण झालेले भक्तिमय वातावरण यामुळे नवरात्रोत्सवाचा प्रारंभ उत्साहात झाला. नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याने कोराडी नगरीत धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. देवीच्या दर्शनाने आणि आशीवार्दाने नवरात्रोत्सवाची सुरुवात करत भाविकांनी सुख, शांती, समृद्धी आणि कल्याणासाठी प्रार्थना केली.

शक्तीची उपासना, भक्तीची अनुभूती आणि परंपरेचा वारसा जपणाऱ्या या नवरात्रोत्सवामुळे कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर परिसर पुढील नऊ दिवस भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

## शेती-किसानी आणि शासकीय योजनांच्या लाभासाठी अधिकाऱ्यांकडून त्रास दिला जात असल्याचा आरोप!

### गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील शेतकरी दिनेश लिल्हारे यांची व्यथा, मानसिक तणावामुळे व्यवसाय बंद करण्याची वेळ आल्याचा दावा

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा**

महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात शेती-किसानी आणि शासकीय योजनांचा लाभ घेताना कथित प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे प्रकरण समोर आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी गेल्या २५ वर्षांपासून संबंधित असलेले कार्यकर्ते आणि गेल्या ३५ वर्षांपासून शेती करणारे दिनेश पुमनलाल लिल्हारे यांनी महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांवर त्रास देत दबाव आणत असल्याचे गंभीर आरोप केले आहेत.

**३५ वर्षांपासून शेती, कर्ज घेऊन खरेदी केला डंपर!**

दिनेश लिल्हारे हे गेल्या ३५ वर्षांपासून शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. परिसरात रोजगाराच्या मर्यादित संधी असल्यामुळे त्यांनी एका खासगी कंपनीकडून कर्ज घेऊन डंपर खरेदी केला होता. या व्यवसायाच्या माध्यमातून स्वतःची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासोबतच कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता.



**शासकीय योजनेअंतर्गत घर आणि शेताच्या बांधबंदिस्तीचे काम**

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारच्या बाडी योजनेअंतर्गत ते आपल्या घराशी संबंधित कामे तसेच शेताच्या बांधबंदिस्तीची कामे करून घेत होते. कुटुंबाला चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि शेती अधिक व्यवस्थित करणे हा या कामांमागील उद्देश होता.

**महसूल अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप**

दिनेश लिल्हारे यांनी महसूल विभागातील काही अधिकारी, ज्यामध्ये तहसीलदार, नायब तहसीलदार आणि तलाठी यांचा समावेश असल्याचे त्यांनी म्हटले आहे, त्यांच्याकडून कथितरीत्या त्रास दिला जात असल्याचा आरोप केला आहे. शासकीय कामे आणि परवान्यांशी संबंधित प्रकरणांवरून आपल्यावर दबाव आणला जात असल्याचे तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. संबंधित अधिकाऱ्यांची बाजू समोर आल्यानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकेल.

**मानसिक तणावामुळे व्यवसाय बंद करण्याची वेळ?**

दिनेश लिल्हारे यांच्या म्हणण्यानुसार, सातत्याने उद्भवणाऱ्या अडचणी आणि मानसिक तणावामुळे त्यांच्यावर व्यवसाय बंद करण्याचा तसेच आपल्याकडील साहित्य कमी किमतीत विकण्याचा विचार करण्याची वेळ आली आहे. अशी परिस्थिती उद्भवल्यास त्यांच्या उपजीविकेवर आणि कुटुंबाच्या आर्थिक भविष्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

**निष्पक्ष चौकशी करून न्याय देण्याची मागणी**

या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. चौकशीत कोणत्याही स्तरावर अनियमितता किंवा अनुचित वर्तन आढळून आल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे. आता या प्रकरणाकडे संबंधित प्रशासन किती गांभीर्याने पाहते आणि शेतकरी दिनेश लिल्हारे यांच्या तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिवाजी पार्क परिसरात आंदोलन करणाऱ्या ३०० हून अधिक आंदोलकांवर गुन्हा दाखल होणार

**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर आता मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये सीजेपी, ठाकरेंची शिवसेना, मनसेच्या कार्यकर्त्यांसोबतच इतरही आंदोलकांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यामध्ये अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येतोय का याकडे सर्वांचं लक्ष आहे. मुंबई पोलिसांनी तब्बल ३०० आंदोलकांना ताब्यात घेतलं होतं आणि नंतर त्यांना सोडण्यात आलं होतं.

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा यासाठी नवी दिल्लीत सीजेपीचे आंदोलन सुरू आहे. त्या आधी तीन दिवस राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीने आंदोलन केलं होतं. त्याच पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील शिवाजी पार्क परिसरात सीजेपीने आंदोलनाची हाक दिली होती. सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी रविवारी सकाळपासूनच शिवाजी पार्क परिसरात तगडा बंदोबस्त ठेवला होता. त्या भागात जाणाऱ्या प्रत्येकाची कसून चौकशी केली जात होती. अशातही आंदोलनासाठी जाणाऱ्या काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

**अमित ठाकरेंनी जाब विचारला**

दरम्यान, शिवाजी पार्क परिसरातील कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं जात असताना त्या ठिकाणी अमित ठाकरे पोहोचले आणि त्यांनी पोलिसांना जाब विचारला. आंदोलकांना ताब्यात घेण्यास मनसे पदाधिकाऱ्यांनी विरोध केला. त्यावेळी मनसेच्या काही नेत्यांसह कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

**आदित्य ठाकरे आक्रमक**

दुसरीकडे, शिवसैनिक आणि मुंबई पोलिसांमध्ये जोरदार राडा झाल्याचं दिसून आलं. सीजेपीकडून मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये आंदोलानाची हाक देण्यात आली होती. मात्र, सीजेपीच्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिली नव्हती. त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांची धरपकड करण्यात सुरु केली होती. सीजेपीला पाठिंबा देण्यासाठी युवा सेनेकडून आंदोलन करण्यात येणार होतं.

## राखी तलाव रामटेकचे पाणी उपसा बंद करण्याबाबत व मुख्याधिकारी नगर परिषद रामटेक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत काँग्रेसचे आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

वरील विषयानुसार रामटेक नगर परिषद हद्दीतील नगर परिषद रामटेकचे मालकीचे राखी तलाव हे फक्त ७० टक्के पाणी साठ्याने भरलेले असून या तलावातील पाणी पातळीवर शहरातील बर्वे ले-आउट, महात्मा फुले वार्ड, सुभाष वार्ड, मानापूर या भागातील घरगुती व सार्वजनिक विहिरी, बोरवेल्स, छोटे मोठे तलाव यांची पाणी पातळी टिकून राहते.

सदर तलावातील पाणी पातळी कमी झाल्यास बर्वे ले-आउट, महात्मा फुले वार्ड,सुभाष वार्ड,मानापूर या भागातील घरगुती पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी व सार्वजनिक विहीर, बोअरवेल यांची पाणी पातळी खालावत जाते. या भागात बहुतांश घरी नगर परिषदची पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन नसल्याने अनेक नागरिक पिण्याचे पाणी, घरगुती पाणी वापर हे या बोअरवेल व विहिरीत उपलब्ध असलेल्या पाण्याच्या स्त्रोतांमधून होते. त्यामुळे या भागाच्या पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या साठी राखी तलावाची पाण्याची पातळी टिकून राहणे गरजेचे आहे.

मात्र रामटेक नगर परिषद दुष्काळी परिस्थितीत ही विकास कामांचा नावाखाली राखी तलावातून पाणी उपसा करत असल्याने मोठ्या प्रमाणात या तलावातून पाण्याचा विसर्ग होऊन लाखो लिटर पाणी गवळण नाल्याने वाहून जात आहे. शहरातील अनेक जागरूक नागरिक या प्रकाराने अचंबित असून एवढ्या भीषण दुष्काळी परिस्थितीत नगर परिषद रामटेकचे मुख्याधिकारी यांचे हे बेजबाबदार वर्तन याची नागरिक निंदा करत आहेत.

मुख्याधिकारी नगर परिषद खिलाड़ी रामटेक हे आपल्या



प्रशासकीय जबाबदाऱ्या पाळण्यात गंभीर नसून त्यांना परिस्थितीची कोणतीही जाण नसून भविष्यातील पाणी पुरवठा टंचाई विषयी बिलकुल गंभीर नाहीत असे दिसून येते.

जिल्हा प्रशासन, राज्य सरकार एकीकडे दुष्काळी परिस्थितीत विवीध उपाययोजना करून शेतकरी, नागरिक यांना भविष्यात पाणी टंचाई भासणार नाही. यासाठी सतत प्रयत्न करत आहेत अनेक विकास कामांना ब्रेक लावण्याचे, शासकीय निधी हे फक्त पाणी टंचाई, जलसंवर्धन, पाणी पुरवठा सबंधित कामाला प्राधान्य देऊन निधी मंजूर करण्यात यावा, अशा सूचना दिल्या जात आहेत, शासकीय निर्णय निर्गमित घेतले जात आहेत.

मात्र रामटेक नगर परिषद ही कदाचित या सर्व निर्णय, उपाययोजना व परिस्थिती पाहून कोसो दूर दिसून येत आहे. ही बाब अत्यंत गंभीर व निष्काळजी पणाची असून आपण कृपया तत्काळ वरिष्ठ अधिकारी यांच्या निदेर्शास ही बाब लक्षात आणून देऊन राखी तलाव येथून सुरू असलेला पाणी उपसा तत्काळ बंद करण्याचा सूचना सबंधित विभागास देऊन हा पाणी उपसा बंद करण्यात यावा.

सदर राखी तलावाच्या प्रस्तावित विकास कामाची निविदा ज्या कंत्राटदारास मिळाली आहे. त्या कंत्राटदारासोबत नगर परिषद मुख्याधिकारी यांचे पती यांची भागीदारी असल्याची चर्चा नगर परिषदचे कंत्राटदार वर्गात असून नगराध्यक्ष व सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य यांची ही कंत्राटदार याने टक्केवारी फिक्स केली असल्याने लवकरात लवकर हे काम उरकून आपापले आर्थिक हित लवकरात लवकर साधण्यासाठी नगर परिषद प्रशासन उतावीळ झाले आहे. त्यामुळे या निविदा प्रक्रियेत कोणा कोणाचा सहभाग आहे याची चौकशी करून कारवाई करावी.

मुख्याधिकारी नगर परिषद रामटेक या सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली काम करत असून त्यांचे पती यांचे या कामातील भागीदारीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नगरसेवक आणि पदाधिकारी यांनी केली आहे.

आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक रमेश कारामोरे गटनेते अभिषेक डहारे नगरसेविका शालिनीताई महाजन, शीतल गजभिये, विनिता आष्टणकर, माजी नगरसेवक उमेश महाजन, पुष्पा बर्वे, शैलेंद्र नागपुरे, कांचनमाला माकडे, बबितताई कोठेकर, अलका सेलोकर यांनी स्वतः आंदोलन करत हा उपसा बंद पाडला.

थोडक्यात

## मनपाच्या भव्य सायकल रॅलीला उदंड प्रतिसाद

### सेवा संकल्प अन् स्वच्छता ही सेवा अभियानाअंतर्गत दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्र व राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियान आणि स्वच्छता ही सेवा अभियाना अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्यावतीने आयोजित भव्य सायकल रॅलीला शहरातील सायकलपटूंनी उदंड प्रतिसाद दर्शविला. अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, टायगर सिटी सायकल असोसिएशनचे सायकलपटू दिलीप वरकड आणि टायगर ग्रुप ऑफ ॲडव्हेंचरचे सायकलपटू रवींद्र करारे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मनपाच्या जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे, क्रीडा विभागाचे शुभम सुपारे यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिव्हिल लाईन स्थित मनपा मुख्यालयाच्या प्रवेशद्वारा पासून सुरू झालेली सायकल रॅली विधान भवन चौक होत,आकाशवाणी चौक प्रधान डाक घर (जी.पी.ओ.) चौक, सी.पी. क्लब, हनुमान मंदिर, तेलंखेडी आणि व्ही.सी.ए. चौक या मार्गाने मार्गक्रमण करून पुन्हा मनपा मुख्यालयासमोरील हिरवळीवर पोहोचली. याठिकाणी रॅलीचा समारोप झाला. या रॅलीमध्ये शहरातील नागरिक, विविध सायकल संघटनांचे सदस्य, ज्येष्ठ सायकलपटू आणि बालसायकलपटूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

**आठ वर्षी चिमुकल्यासह ८५ वर्षीय सायकलपटूनी केली जनजागृती**

रॅली दरम्यान सर्व वयोगटातील सायकलपटूंनी उत्साहाने सहभाग नोंदविला. यावेळी आठ वर्षीय चि. विनय चौधरी सह ज्येष्ठ सायकलपटूं ८५ वर्षीय श्रीपाद भुरडे यांचा सहभाग. नोंदविला श्री. श्रीपाद भुरडे यांनी "सायकल चालवा! पर्यावरण वाचवा सायकल चालवा, आरोग्य राखा सायकल चालवा! इंधन वाचवा झाडे लावा ! झाडे जगवा... !" असे जनजागृती फलक हाती घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

## साखर-सुंठ

### निष्ठेचा मुखवटा

कार्यकर्ता झाला नाराज, पक्षाविरुद्ध केला एल्गार,
तिकीट काय हुकलं, सुरू झाला स्वाभिमानाचा बाजार!
कालपर्यंत पक्षनिष्ठेचा घेत होता जो आधार,
आज त्याच पक्षाविरुद्ध उघडला बंडाचा दरबार!
तुम्हीच सांगा भाऊ, हा स्वाभिमान की सत्तेचा व्यापार?

बंड करताना गर्जना मोठी, शब्दांचा नुसता वार,
निकाल लागताच शांत झाला विरोधाचा अंगार!
काल ज्यांच्यावर टीका केली, आज त्यांचाच जयजयकार,
खुर्चीची चाहूल लागताच बदलला विचार!
सांगा ना भाऊ, ही निष्ठा की सत्तेचा चमत्कार?

तिकीट मिळालं तर पक्ष महान, नेते वाटतात थोर,
तिकीट हुकलं की त्याच पक्षाविरुद्ध उठतो जोर!
कालपर्यंत शिस्तीचे धडे, आज बंडाचा शोर,
स्वार्थाची वेळ आली की तत्त्वांनाही लागतो जोराचा घोर!
तुम्हीच सांगा भाऊ, हा तत्त्वांचा लढा की खुर्चीचा जोर?

बंड करताना छाती पुढे, भाषणात नुसती आग,
निकाल लागताच विरून जातो नाराजीचा राग!
काल म्हणे पक्षच चुकीचा, नेत्यांचा उघडला हिशेब,
आज त्यांच्याच दारात जाऊन निष्ठेचा पुन्हा लेखाजोखा!
सांगा भाऊ, हा स्वाभिमान की सोयीचा हिशेब?

ओठांवर निष्ठेची भाषा, मनात पदाची आस,
संधी दिसताच बदलतो विचारांचा प्रवास!
कार्यकर्त्यांच्या त्यागाचा घेतो भाषणात ध्यास,
पण स्वतःची वेळ आली की स्वार्थच ठरतो खास!
तुम्हीच सांगा भाऊ, निष्ठा खरी की स्वार्थाचा आभास?

वेळ सरली, राग निवळला, थंड पडला अंगार,
मागच्या दारानं परतताना चेहऱ्यावर निष्ठेचा शृंगार!
कालचा विरोध विसरून आज स्वागताचा सत्कार,
पदाची आशा दिसताच बदलला विचारांचा संसार!
सांगा भाऊ, हा घरवापसीचा निर्णय की सत्तेचा व्यवहार?

पक्षासाठी झटलो म्हणताना शब्दांचा मोठा थाट,
तिकीट नाही मिळालं की पक्षाशीच धरतात वाट!
कालपर्यंत पक्षासाठी जीव देण्याची बात,
आज त्याच पक्षाविरुद्ध उघडली बंडाची वाट!
तुम्हीच सांगा भाऊ, ही निष्ठा की संधीची लाट?

बंड पुकारताना म्हणे तत्त्वांचा मोठा लढा,
पुन्हा पक्षात येताना कुठे हरवला तो बाणा?
कालचा विरोध आज मैत्री, कालची आग आज शांत,
खुर्चीचा दरवाजा उघडताच तत्त्वांनाही मिळतो विराम!
तुम्हीच सांगा भाऊ, बंडखोर बदलतो की बदलतो फक्त रंग?
निष्ठेच्या नावाखाली किती दिवस चालणार हा ढोंगी ढंग?

**- आपला पंढरी**

# आईला मिळाली माया, लेकरांना मिळाली आई!

### जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या पूर्वसंध्येला प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूरच्या दहा महिन्यांच्या प्रयत्नांना यश, जवळपास दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या महिलेचे कुटुंबासोबत पुनर्मिलन, तुम्ही आम्हाला अनाथ होण्यापासून वाचवले! : मुलाच्या या भावनिक शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मानसिक आजार माणसाला त्याच्या कुटुंबापासून दूर नेऊ शकतो; मात्र माणुसकी, संवेदनशीलता आणि सातत्यपूर्ण प्रयत्न त्याला पुन्हा आपल्या माणसांपर्यंत पोहोचवू शकतात. या विचाराला प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित करणारी एक हृदयस्पर्शी घटना जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या पूर्वसंध्येला प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे घडली. जवळपास दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या छत्तीसगडमधील एका महिलेचा शोध घेऊन तिचे कुटुंबासोबत पुनर्मिलन करण्यात रुग्णालयाच्या पथकाला यश आले. तब्बल दहा महिन्यांच्या अथक प्रयत्नांनंतर घडलेल्या या पुनर्मिलनामुळे एका आईला तिची मुले पुन्हा भेटली, तर आईच्या प्रतीक्षेत असलेल्या मुलांच्या आयुष्यात पुन्हा आनंद फुलला. आईला पाहताच मुलाच्या डोळ्यांत तरळलेले अश्रू आणि तिच्या चेहऱ्यावरील आनंदाने उपस्थितांचे मन हेलावून गेले.

**ओळख नव्हती, पत्ता नव्हता; स्वतःच्या नावाबाबतही संभ्रम!**

अंदाजे ४५ वर्षांच्या या महिला रुग्णाला मा. मुख्य न्यायाधीश, भंडारा यांच्या आदेशानुसार पोलीस स्टेशन, भंडारा यांनी २ जानेवारी २०२६ रोजी उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे दाखल केले होते. भरतीच्या वेळी तिच्याजवळ ओळख पटविणारा कोणताही पुरावा नव्हता. स्वतःच्या नावाबाबतही ती साशंक होती. ती दोन वेगवेगळी नावे सांगत असे. भाषेची अडचण आणि अस्पष्ट बोलण्यामुळे तिच्या कुटुंबाचा शोध घेणे हे मोठे आव्हान ठरत होते.

रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पंकज बागडे आणि डॉ. कृणाली उके यांनी तिच्यावर मानसोपचार केले. उपचारांमुळे तिची मानसिक स्थिती सुधारू लागली. मात्र, मानसिक स्थिती स्थिर झाल्यानंतर तिला घराची आणि आपल्या मुलांची तीव्रतेने आठवण येऊ लागली. घरी परतण्याची तिची ओढ वाढत होती.

**नऊ महिन्यांचे समुपदेशन आणि अनेक राज्यांत शोधमोहीम**

रुग्णालयाच्या समाजसेवा अधीक्षक श्रीमती कुंदा काटेखाये बिडकर यांनी गेल्या नऊ महिन्यांपासून या महिलेचे सातत्याने समुपदेशन केले. तिच्याकडून मिळणाऱ्या प्रत्येक माहितीच्या धाग्याला धरून तिचे मूळ गाव आणि कुटुंब शोधण्याचे अनेक प्रयत्न केले. छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातील आठ ते नऊ पोलीस ठाण्यांशी संपर्क साधण्यात आला. जबलपूर येथील जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक कार्यालयाशीही पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, सुरुवातीला या प्रयत्नांना यश मिळत नव्हते.

महिलेची मानसिक स्थिती सुधारत असताना तिच्या मनातील घरवापसीची आस अधिक तीव्र होत होती. तिची ही तळमळ पाहून श्रीमती बिडकर यांनीही तिच्या कुटुंबाचा शोध घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू ठेवली.

**एका धाग्याने जोडले मायलेकरांचे तुटलेले नाते!**

महिलेने आपल्या मुलीच्या लग्नाचा आणि कोरबा जिल्ह्यातील काही नातेवाइकांचा उल्लेख केला. या माहितीच्या आधारे श्रीमती बिडकर यांनी रायपूर येथील मदर तेरेसा आश्रमाच्या समन्वयक संगीता पारेकर यांची मदत घेतली. त्याचबरोबर कोरबा पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधण्यात आला. या प्रकरणाची संवेदनशीलता आणि महिलेची आपल्या कुटुंबाला भेटण्याची तीव्र इच्छा लक्षात घेऊन कोरबा येथील पोलीस निरीक्षक नरहरी पटेल यांनी तातडीने चौकशी सुरू केली. कोरबा जिल्ह्यात शोध घेऊनही यश मिळाले नाही; मात्र त्यांनी जबलपूर येथील पोलीस स्टेशन रतनपूरच्या पोलीस निरीक्षकांशी संपर्क साधला. त्यानंतर अवघ्या तीन तासांत महिलेच्या मुलाचा शोध लागला आणि दहा महिन्यांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले!

**व्हिडिओ कॉलवर आईला पाहताच मुलाच्या डोळ्यांत अश्रू**

आई आणि मुलाची पहिली भेट प्रत्यक्षात होण्यापूर्वी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून घडवून आणण्यात आली. जवळपास दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या आईला समोर पाहताच महिला भावूक झाली. दुसरीकडे, आईच्या शोधात असलेल्या मुलालाही अश्रू अनावर झाले. दोन दिवसांतच महिलेचा मुलगा आणि जावई तिला घरी घेऊन जाण्यासाठी प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल झाले. यावेळी मुलाने व्यक्त केलेल्या भावना उपस्थितांच्या काळजाला भिडल्या.

'मॅम, हम लोगों ने माँ को बहुत ढूँढा। पुलिस में गुमशुदगी की शिकायत भी दी थी। घरवाले समझ रहे थे कि माँ मर गई। मैं १४ साल का था, तब पापा गुजर गए। अभी माँ भी नहीं मिल रही थी। हम अनाथ जैसे जी रहे थे। आप लोगों का धन्यवाद, आपने हम भाई-बहन को अनाथ होने से बचाया।'

मुलाच्या या शब्दांत आईपासून दूर राहण्याचे दुःख, तिला गमावल्याची भीती आणि पुन्हा भेटल्याचा आनंद एकवटला होता. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठीही हा क्षण अत्यंत भावूक होता.

**निरोप देताना रुग्णालयातील वातावरण भावूक**

गेल्या दहा महिन्यांत या महिला रुग्णाने आपल्या प्रेमळ स्वभावाने रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले होते. त्यामुळे तिच्या कुटुंबासोबत पुनर्मिलनाचा आनंद असला, तरी तिला निरोप देताना उपस्थितांचे डोळे पाणावले. यावेळी समाजसेवा अधीक्षक श्रीमती कुंदा काटेखाये बिडकर, मेट्रन प्रतिभा मानकर, इन्चार्ज सिस्टर वनश्री तोतावार, अनुचर सुशीला उके, पद्मा पुयाड, अनिता महाबुधे, सरिता, आशा आदी उपस्थित होत्या. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी या महिलेला साडी, ड्रेस आणि साजश्रृंगाराच्या वस्तू प्रेमपूर्वक आहेर म्हणून दिल्या. हा केवळ रुग्णाला घरी पाठविण्याचा प्रसंग नव्हता, तर एका आईला तिचे कुटुंब आणि दोन भावंडांना त्यांची आई पुन्हा मिळवून देणारा अविस्मरणीय क्षण होता.

## 'एल निनो'च्या संकटावर 'समशेर फाउंडेशन' व चांपा ग्रामपंचायतीचा मात; श्रमदानातून जलसंधारणाची चळवळ उभारली





**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा पावसाने मारलेली दडी आणि दुष्काळसदृश परिस्थिती यामुळे ग्रामीण भागात पाण्याचे संकट गंभीर बनले आहे. मात्र, पावसाची वाट पाहत न बसता उमरेड तालुक्यातील चांपा येथे समशेर फाउंडेशन व ग्रामपंचायत चांपा यांच्या संयुक्त विद्यमाने चांपा गावात जलसंधारणासाठी सरसावले आहे. श्रमदानातून रेन वॉटर हार्वेस्टिंग, रिचार्ज ट्यूबवेल आणि वनराई बंधारे उभारून समशेर फाउंडेशनने गावाच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आदर्श निर्माण केला आहे.

चांपा आणि परिसरामध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पाऊस न पडल्याने शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. अशा परिस्थितीत वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढवण्यासाठी समशेर फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. फाउंडेशनने चांपा ग्रामपंचायतीच्या सहकार्याने जिल्हा परिषद शाळा आणि समशेर नगर येथे आतापर्यंत ५ पेक्षा अधिक सोक खड्डे आणि शाळा परिसरात रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.

**पुढील टप्प्यातील कामे आणि आव्हाने**

समशेर फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल पवार यांनी सांगितले की, "पावसाचे पाणीच गावाचा खरा खजिना आहे. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवणे हेच आमचे ध्येय आहे." टप्प्यात गावात आणखी १० खड्डे (पिट्स) तयार करणे, चांपा गावातील एकमेव सार्वजनिक विहिरीचे पुनर्भरण तयार करणे आणि नदी-नाल्यांवर वनराई बंधारे बांधण्याचे नियोजन आहे. सध्या या कामांसाठी आवश्यक असणारे साहित्य आणि जेसीबी मशीनचा खर्च मोठा आहे. समशेर फाउंडेशनचे सदस्य स्वतः मेहनत-मजुरी करून या कामांसाठी निधी जमवत आहेत.त्याला गट ग्रामपंचायत चांपा ची साथ मिळत आहे. परंतु ही जलसंधारणाची चळवळ अधिक वेगाने पुढे नेण्यासाठी नागरिकांनी, दानशूर व्यक्तींनी आणि सामाजिक संस्थांनी आर्थिक व साहित्याच्या रूपात मदत करावी, असे आवाहन अध्यक्ष अनिल पवार यांनी केले आहे.

## नेपाळमध्ये पुन्हा हाहाकार!

**गोरखा :** नेपाळमध्ये पुन्हा एकदा भीषण महापुरामुळे हाहाकार उडाला आहे. दीड महिन्यांपूर्वी आलेल्या महापुरातून सावरत असलेल्या नेपाळमधील गोरखा जिल्ह्यातील चुमनुब्री भागात पहाटे बुर्ही गंडक नदीला अचानक पूर आला. यामुळे पैयू आणि बगर या गावातील जवळपास ३५ घरे पुराच्या पाण्यात वाहून गेली आहेत. अनेक गावांना पुराचा फटका बसला असून वाहतुकीसाठी वापरले जाणआरे पूल आणि झुलते पूलही वाहून गेले आहेत. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले असून काही लोकांना एअरलिफ्टही करण्यात आले आहे. गोरखाचे प्रमुख जिल्हा अधिकारी धरेन्द्र कुमार मिश्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे ४ वाजून ३५ मिनिटांनी मोठा पूर आल्याची माहिती प्रशासनाला मिळाली. परिस्थितीची पाहणी करण्यासाठी नेपाळी लष्कराचे हेलिकॉप्टर पाठविण्याची तयारी करण्यात आली. दरम्यान, नदीच्या खालच्या प्रवाहातील आणि किनारी भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचे तसेच सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. बुर्ही गंडक नदीच्या पुरामुळे परिसरातील वाहतूक व्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. आरुघाट ग्रामीण नगरपालिकेतील सोती आणि मांबू यांना जोडणारा मोटार पूल पुराच्या पाण्यात वाहून गेला. चुमनुब्री ग्रामीण नगरपालिकेतील न्याकचेत येथे न्याकचेत आणि सिर्दिबास यांना जोडणारा जुना झुलता पूलही कोसळून वाहून गेल्याची माहिती पोलिसांनी दिली. याशिवाय धार्चे ग्रामीण नगरपालिकेतील माछीखोला ते केरौजा यांना जोडणारा झुलता पूलही पुराच्या तडाख्यात उद्ध्वस्त झाला. आरुघाट ग्रामीण नगरपालिका क्षेत्रातील सोती येथील लोखंडी पूलदेखील पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला. या पुलांमुळे अनेक गावांचा परस्परांशी असलेला संपर्क विस्कळीत झाला असून मदतकार्य पोहोचविण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

## दुसरी कर्तृत्ववान स्त्री, 'अंगणवाडी सेविका'

# बालकांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचणारी मायेची मूर्ती!

**नवरात्री विशेष : नऊ दिवस, नऊ कर्तृत्ववान स्त्रिया**

**सौ. माधुरी धनोकार, अकोला**

स्त्री म्हणजे माया, ममता, त्याग आणि कर्तृत्व यांचा सुंदर संगम! नवरात्रीच्या नऊ दिवसांत आपण देवीच्या विविध रूपांची पूजा करतो. मात्र, आपल्या समाजात अशा अनेक स्त्रिया आहेत, ज्या कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न करता पुढील पिढीचे भविष्य घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यापैकी एक म्हणजे अंगणवाडी सेविका!

लहान मुलांच्या निरागस हास्यातून भविष्याचे सुंदर स्वप्न पाहणारी आणि त्यांच्या बालपणाला योग्य दिशा देणारी अंगणवाडी सेविका ही समाजातील एक महत्त्वाची घटक आहे. बालकांच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्यांना योग्य संस्कार, पोषण आणि शिक्षणाची गोडी लावण्याचे काम ती मनापासून करते.

सकाळपासूनच तिच्या कामाला सुरुवात होते. अंगणवाडीतील मुलांची उपस्थिती नोंदविणे, त्यांना खेळातून शिकविणे, गोष्टी सांगणे, गाणी शिकविणे, पूर्वप्राथमिक शिक्षण देणे, पोषण आहाराशी संबंधित कामे करणे आणि बालकांच्या आरोग्य व वाढीकडे लक्ष देणे अशा विविध जबाबदाऱ्या ती पार पाडते. यासोबतच गर्भवती माता, स्तनदा माता आणि कुटुंबांना पोषण, आरोग्य व बालसंगोपनाविषयी मार्गदर्शन करण्याचे कामही तिच्या कार्याचा भाग असते.

एखादे मूल पहिल्यांदा अक्षर ओळखते, एखादे मूल पहिल्यांदा गाणे म्हणते किंवा भीतभीत अंगणवाडीत आलेले मूल हळूहळू आत्मविश्वासाने बोलू लागते, तेव्हा त्या छोट्याशा प्रगतीमागे अंगणवाडी सेविकेचे प्रेम, संयम आणि प्रयत्न असतात. प्रत्येक बालकाच्या क्षमतेला ओळखून त्याला शिकण्याची संधी देणे, ही तिच्या कामाची खरी ताकद आहे. मात्र, या सेविकेच्या वाट्यालाही अनेक आव्हाने येतात. मर्यादित साधनसामग्री, विविध प्रशासकीय कामे, नोंदी ठेवण्याची जबाबदारी आणि वेळेची कमतरता यातून मार्ग काढत तिला आपले काम करावे लागते. तरीही बालकांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या प्रगतीतून मिळणारे समाधान तिला पुढे जाण्याची प्रेरणा देते.

अंगणवाडी सेविका ही केवळ मुलांना शिकवणारी महिला नाही, तर ती बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणारी मार्गदर्शक, पालकांची




मदतनीस आणि समाजातील जनजागृतीची महत्त्वाची दुवा आहे. बालकांचे आरोग्य, पोषण आणि शिक्षण यांचा भक्कम पाया रचण्यात तिचे योगदान मोलाचे आहे.

आज गरज आहे ती तिच्या कामाची योग्य दखल घेण्याची, तिला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची आणि तिच्या श्रमांना सन्मान देण्याची. कारण बालकांच्या विकासासाठी काम करणाऱ्या या स्त्रीला बळ देणे म्हणजे देशाच्या भविष्याला बळ देणे होय.

नवरात्रीत देवीच्या शक्तीला वंदन करताना या मायेच्या मूर्तीलाही सलाम करूया. तिच्या कार्याचा गौरव करूया आणि प्रत्येक बालकाला उत्तम पोषण, शिक्षण व प्रेम मिळावे यासाठी तिच्या प्रयत्नांना सहकार्य करूया. कारण, आजच्या बालकांना योग्य दिशा मिळाली, तर उद्याचा समाज अधिक सुजाण, सशक्त आणि समृद्ध होईल!

**अंगणवाडी सेविकेला समर्पित चारोळी**

चिमुकल्यांच्या हास्यामध्ये, भविष्याचे स्वप्न पाहते, ज्ञान, संस्कार, मायेने, बालमनाला ती घडवते; पोषण आणि शिक्षणाची, सुंदर वाट दाखवते, अंगणवाडी सेविका, उद्याचा भारत घडवते!

**संदेश**

या नवरात्रीत अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा सन्मान करूया. बालकांच्या आरोग्य, पोषण आणि शिक्षणासाठी त्या करीत असलेल्या प्रयत्नांची दखल घेऊया. त्यांच्या कार्याला सहकार्य करून प्रत्येक बालकाच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावूया. अंगणवाडी सेविकेचा सन्मान म्हणजे बालपणाचा सन्मान आणि देशाच्या भविष्याचा सन्मान!